मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणात जन्म-मृत्युविभागाकडील जन्म-मृत्युअहवाल, दाखले इत्यादींचे फॉर्मस व पुस्तिका महानगरपालिकेच्या हद्दीतील, हॉस्पीटल्स यांना देण्यात आल्यानंतर फॉर्मस व पुस्तिका यांचे शुल्क सामान्य पावतीव्दारे स्वीकारण्यात आले आहेत. वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 या कालावधीतील काही पावत्या योग्य कारण न देता अथवा प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीविना रद्द केल्याचे नमुद केलेले आहे.

सदर पावत्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	पावती पुस्तक क्र.	पावती क्र.	दिनांक	रक्कम (पावती प्रमाणे प्राप्त)	अभिप्राय
1.	1268	126726	15/06/2020	200/-	आनंदक्लिनीक मूळ पावतीवर रक्कम रु.200/- स्थळ पावतीवर रक्कम नमुद केलेली नाही.
2.	1268	126727	15/06/2020	100/-	आनंद क्लिनीक मूळ पावती कार्बन मध्ये रक्कम रु.100 स्थळ पावतीवर रक्कम नमुद नाही.
			एकूण	**300/-**	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) सदर पावती कोणत्या कारणास्तव रद्द केलेल्या आहेत याबाबत प्रधिकाऱ्याने प्रमाणित केलेले नाही. तसेच सदर पावती ऐवजी कोणत्या पावत्याद्वारे नमुद रक्कम संकलन करुन महानगरपालिकेच्या निधीत भरणा केली आहे. याबाबतचे पूर्तता अनुपालन दर्शवेपर्यंत सदरील पावतीत नमुद रक्कम रु.300/- वसूल पात्र समजण्यात येत असून सदर रक्कम संबंधिनाकडून वसूल करुन महानगरपालिका फंडात जमा करवी.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.15.3:- जन्म-मृत्यु दाखला फी हया लेखाशिर्षाखाली संकिर्ण जमा रक्कमेमधील फरका बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत जन्म-मृत्यु विभागातील वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 या कालावधी मधील कोड नंबर 1519 संकिर्ण जमा जन्म-मृत्यु दाखला फी लेखाशिर्षा अंतर्गत वित्त वर्ष 2020-2021 हया कालावधीतील जन्म-मृत्युदाखला फी जमा रक्कम खालीलप्रमाणे आहे.

अ) जन्म-मृत्यु विभागाकडील जमा रक्कम

1) जन्म दाखला फी रक्कम रु.4,40,050/-
2) मृत्यू दाखला फी रक्कम रु.3,77,680/-

एकुण जन्म-मृत्यु दाखला फी रक्कम रु.8,17,730/-

ब) वार्षिक अहवाला प्रमाणे जन्म-मृत्यु दाखला फी जमा रक्कम

कोड नंबर 1519 प्रत्यक्ष जमा रक्कम रु.8,53,000/-

क) फरक रक्कम रु.35270/-

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 102 नुसार जमा रक्कम उचित लेखाशिर्षाखाली दर्शविणे आवश्यक आहे. तसेच नियम 46 नुसार अभिलेख ठेवण्यात येवून नियम 49,59,61,50,84,94 अन्वये याबाबतच्या नोंदी घेवुन नियम- 105,106 व 107 हया नुसार हया बाबतच्या अचुकता प्रमाणित करून विसंगती असल्यास फेरफार नोंद घेवून प्राप्त रक्कम गौण लेखाशिर्षा नमुना सह पडताळणी करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

तरी सदर फरका बाबत लेखापरीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.15.4:- पावतीव्दारे संकलन केलेली रक्कम मनपा खाती जमा नसल्याबाबत …

मिरा भाईंदा महानगरपालिकेच्या सन 2020-2021 व 2021-2022 च्या लेखापरिक्षणात जन्ममृत्यु विभागाकडील जळाऊ लाकूड विक्रीच्या सामान्य पावत्या व पोटकिर्दीची पडताळणी केली असता पावती पुस्तक क्रमांक 1269 मधील पावती क्रमांक 126820 ने दिनांक 02/07/2020 रोजी श्री. मनीष आसानी यांचेकडून जळाऊ लाकडांची रु. 1000/- स्वीकारली आहे. तथापि सदरच्या पावती नोंद पोटर्कीद रद्द केल्याबाबतचे कोणतेही कारण पावतीवर व पोटकीर्दीत करुन पावती रद्द केल्याबाबतचे संबधित प्राधिकाऱ्याने प्रमाणित पावती रद्द केलेली नाही तसेच पावतीवर रु. 500 च्या दोन नोटा स्वीकारण्याचा तपशिल असून नोटांचे तपशील क्रमांक खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

1.TMC 889929

2.ETK 667678

तरी कमी जमा रक्कम 1000/- महानगरपालिकेच्या खाती जमा करुन लेखापरिक्षणास पूर्ततेसह अनुपालन दर्शवावे

वसुलीपात्र रक्कम रु. 1000/-

जाहिरात विभाग

परिच्छेद क्र.16.1:- रोख रक्कम व धनादेश रक्कमांचे एकत्रित चलन तयार केलेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत जाहिरात विभागाचे वित्तीय वर्ष 2020-2021 व 2021-2022 या कालावधीचे जमा रक्कमेचे रेखांकन करताना पावत्या/ पोटकिर्द व चलन तपासले असता चलन नोंदीमध्ये खालील अनियमितता दिसुन येत आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 85 नुसार रोख स्वरुपात आणि धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या रक्कमेची नोंद करण्यासाठी स्वतंत्र चलन वापरणे आवश्यक आहे. तथापि जाहिरात विभागाने रोखीने प्राप्त व धनादेशाद्वारे प्राप्त रक्कमेसाठी एकत्रित चलन वापरलेले आहे.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.16.2:- पावती पुस्तके वसुलीसाठी वापरापूर्वी त्यातील पावत्या प्रमाणित करणेबाबत व साठा नोंदवहीत नोंदणी करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जाहिरात (मुख्यालय) विभागाचे सन 2020-2021 व 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पावती पुस्तके साठा व साठा नोंदवही नमुना नंबर 116 तपासला असता खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका व औद्योगिक नगरी लेखासंहिता 2013 मधील नियम 80 नुसार मुद्रणालयाकडून पावती पुस्तक प्राप्त झाल्यानंतर लगेचच प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रत्येक पुस्तकामध्ये अंतर्गत असलेल्या पावत्यांची एकुण संख्या याची तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही संबधित विभागाकडून करण्यात आलेली नाही.

2) पावती पुस्तकाच्या शेवटच्या पृष्ठावर संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांने प्रमाणित करणे आवश्यक असताना पावती पुस्तके प्रमाणित करण्यात आलेली नसताना वापर केलेला आहे.

3) साठा रजिस्टर नमुना नंबर 116 मध्ये प्राप्त पावती पुस्तकाची संख्या त्या त्या वर्षात नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच पुस्तके वापरावयास काढताना त्या तारखेची नोंद घेऊन पुस्तक वापरावयास घेणाऱ्या कर्मचारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

4) नमुना नंबर 116 पृष्ठ क्रमांक देण्यात आलेले नाहीत. तसेच महागनरपलिकेचा प्रत्येक पृष्ठावर सिल उमटविणे व नमुना नंबर 116 मधील पृष्ठे नमुद करुन संबंधित प्राधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

वरील त्रुटींची पूर्तता करून लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.16.3:- रद्द पावती बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभाग (मुख्यालय) सन 2020-2021 व 2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये दि.07/06/2021 रोजी पावती बुक क्रमांक 179 पावती क्र.17845 श्री. अव्हेन्यु सुपर मार्केट डी- मार्ट तळमजला सालासर बिजनेस पार्क जवळ भाईंदर (प.) सदर पावती सन 2021-2022 या आर्थिक वर्षामध्ये पोटकिर्द मध्ये रद्द दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार रद्द केलेल्या दोन्ही पावत्या स्थळ प्रत व मूळ प्रत पावती पुस्तका मध्ये आढळून येणे आवश्यक असताना, सदर पावती क्रमांकाची दोन्ही प्रती पावती पुस्तकात आढळून आलेली नसताना, कोणत्या प्राधिकाराने सदर क्रमांकाची पावती रद्द केली याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी. तसेच सदर पावतीचा काही दुरुपयोग झाल्याचे शक्यता नाकारता येत नाही. जर काही दुरुपयोग झाल्यास त्यास पूर्तता विभागाची जबाबदारी राहील.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.16.4:- जाहिरात शुल्कापोटी धनादेशाद्वारे संकलन झालेली शुल्क रक्कम बँक खाती धनादेश न वटल्याने प्रत्यक्ष वसुली न झाल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाचे वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 हया कालावधीतील निवडक महिन्यातील नमुद केलेले धनादेशाद्वारे संकलन झालेल्या परवाना शुल्काची रक्कम महानगरपालिकेच्या बँक खाती धनादेश न वटल्याने जमा झालेली नाही. याबाबत पावती/ चलन धनादेश नोंदवही ची पडताळणी करुन धनादेश बँक खाती वटलेले नसल्याचे तपशिल खालीलप्रमाणे नमुद केलेला आहे.

अ.क्र.	खातेधारकाचे नाव	धनादेश बँकेचे नाव	धनादेश क्रमांक	धनादेश दिनांक	रक्कम	मुळ पावती क्रमांक/ दिनांक
1.	मे.एगेंज पब्लीसिटी ला.क्र.112	Union Bank	639772	25/04/2021	1,93,536/-	17840 01/06/2021
2.	मे.एगेंज पब्लीसिटी ला.क्र.112	Union Bank	639773	10/05/2021	1,93,536/-	17841 01/06/2021
3.	आकाश इंटरप्रायजेस ला.क्र.111	Axis Bank	092185	31/03/2021	1,93,500/-	17804 24/05/2021
4.	I.D.B.I. बँक	I.D.B.I Bank	004318	09/09/2020	18,000/-	17462 09/09/2020
5.	मे. आऊट ॲन्ड आऊट गुरुकृपा ला.क्र.126	H.D.F.C. Bank	000076	25/02/2022	4,25,856/-	0355 21/03/2022
6.	मे. आऊट ॲन्ड आऊट गुरुकृपा ला.क्र.127	H.D.F.C. Bank	000075	20/02/2022	3,00,000/-	0354 21/03/2022
				एकुण	**13,24,428/-**	

वसुल पात्र रक्कम रु. 13,24,428/-

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 98 अन्वये जे धनादेश वटल्यास नाकारले गेले आहेत, त्या बाबतचा आढावा घेवून मुळ पावती रद्द करण्यात आल्याची माहिती अदात्यास देण्यात येवून अशा उक्त अदात्याकडे अशा रक्कमेची मागणी रोख किंवा केवळ धनाकर्षाद्वारे बँक आकराच्या रक्कमेसह भरणा करुन घेणे आवश्यक असता अशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. अथवा पावतीही रद्द केलेली नाही. त्यामुळे एकुण रक्कम रु.13,24,428/- परवाना शुल्क रक्कम वसुली झालेली नाही तसेच चेक न वटलेल्या प्रकरणी रु.150/ प्रमाणे 6 धनादेशाची रक्कम रु.900/- वसुल पात्र रोखीने अथवा धनादेशाद्वारे केलेले असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदरची रक्कम रु. (13,24,428/- + 900/-) एकुण रु.13,25,328/- वसुल करुन पूर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 99 अन्वये मुळ वसुली नोंद लेखा पुस्तकामध्ये फिरविण्यासाठी आवश्यक नोंद करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न केल्याने वार्षिक अहवाल व कॅशबुक/ बँक पासबुक ताळमेळ मध्ये फरक झालेला आहे.

3) मागणी नोंदवहीत उलट वसुली फिरवून थकित मागणी दर्शविलेली असल्याबाबत मागणी नोंदवही उपलब्ध न झाल्याने ह्या बाबत पडताळणी करता आलेली नाही.

4) नमुद केलेल्या खातेधारकांचे धनादेश न वटल्याने महानगरपालिका निधीत परवाना शुल्क रक्कम जमा न झाल्याने त्यांच्या परवाना नुतनीकरण रद्द करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 101 अनव्ये न वटलेल्या धनादेशा बाबत Negotiable instrument Act 1881 चा कलम 26 अन्वये विभागाने कार्यवाही केलेली नाही.

6) सदर परवानाधारका कडून परवाना दिल्याच्या दिनांका पासून ती रक्कम प्रत्यक्ष वसुल होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत मुळ परवाना शुल्क रक्कमेवर 18% व्याजाने होणारी रक्कम परिगणित व्याजाच्या रक्कमेसह परवाना शुल्क रक्कम वसुल करुन महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळून लेखापरीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

शिक्षण विभाग

परिच्छेद क्र.17.1:- 7 वा वेतन आयोगाच्या थकबाकीच्या हप्त्यांची प्रदान रक्कमांची नोंद भविष्य निर्वाह निधी नोंदवहीत नोंदी नोंदविण्यात आलेल्या नसल्याबाबत.

7 व्या वेतन आयोगाच्या वेतनाची थकबाकी 5 समान हप्त्यात 5 वर्षात कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणेबाबत शासन अधिसुचना क्रमांक वेपूर-2019/प्र.क्र.1/सेवा-1 दि.30 जानेवरी 2019 आदेशित केलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधीचे भविष्य निर्वाह निधी नोंदवही नमुना नं.98 अभिलेखांची पडताळणी केली असता शिक्षक कर्मचारी वर्गाची 7 वा वेतन आयोग थकबाकी फरकाच्या हप्त्यांची जमा नोंद भविष्य निर्वाह निधी नमुना नं.98 मध्ये नमुद केलेली नसल्याचे निर्देशनास येते. याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.2:- वेतन अनुदान नोंदवही बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्रवर्गाच्या वेतनासाठी व निवृत्ती वेतनासाठी 50% अनुदान रक्कम शासनाकडून महानगरपालिकेस वितरण केले जाते. महानगरपालिकेस वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधीत 50% रक्कमेचे वेतन व निवृत्ती वेतन अनुदान नोंदवही शिक्षण विभागाने ठेवलेली नाही.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 62,315,317,450 अन्वये अनुदान नोंदवही नमुना नंबर 26 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तथापि अशी अनुदान नोंदवही ठेवलेली नाही तरी सदर अनियमितता बाबत लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.
2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 नियम 317 अन्वये वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधीतील प्राप्त अनुदानाचे मंजूरी आदेश/ वित्त प्रेषण आदेश नस्ती ठेवणे आवश्यक असताना अशी मंजुरी आदेश/ वित्त प्रेषण आदेश अभिलेख शिक्षण विभागाने ठेवलेले नाहीत.
3) सदर अभिलेख ठेवणे बाबत वित्त वर्ष 2016-2017 च्या कालावधीतील लेखापरीक्षणात आक्षेप नमुद करुनही या सुचनेचा शिक्षण विभागाने गांभिर्याने नोंद घेतलेली दिसून येत नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.3:- भविष्य निर्वाह निधी चे लेखा विवरण पत्र वर्गणीदारास पाठविले नसल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधीचे कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे अभिलेख लेखापरीक्षणात पडताळणी केली असता भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदारांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 36 प्रमाणे भविष्य निर्वाह निधी चे वार्षिक लेखा विवरणपत्र पाठविणे आवश्यक आहे. जेणेकरुन वर्गणीदार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 36(1) (अ/ब) व 36(3) (1 ते 5) प्रमाणे उचित कार्यवाही करणे शक्य होईल. तथापि भविष्य निर्वाह निधीचे त्या त्या वर्षाचे वार्षिक लेखा विवरणपत्र वर्गणीदारास पाठविण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणास निर्देशनास येते. या अनियमितता बाबत अनुपालन पूर्तता दर्शवावी

परिच्छेद क्र.17.4:- वाहतूक भत्ता रक्कम वेतनात नियमबाह्यपणे अदा केल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागातील शिक्षक ह्या पदावरील कार्यरत शिक्षकांचे माहे मे 2021 व माहे मे 2022 या महिन्याचे वेतन अदा माहे जून 2021 व माहे जून 2022 नुसार खालील प्रमाणे स्थूल रकमेच (एकुण रक्कमेचे) देयके पारित कलेले आहेत.

अ.क्र.	वर्ष	एकुण मंजूर पदे	एकुण कार्यरत शिक्षक	देयकाची स्थूल रक्कम	प्रवासभत्ता रक्कम (T.A. रक्कम)
1.	2020-2021	237	165	10,10,335/-	59,600/-
2.	2021-2022	202	158	1,00,63,333/-	62,400/-
			एकुण	**2,01,73,668/-**	**122000/-**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) माहे मे महिन्यात शाळेला सुट्टी असल्याने शाळा बंद असते व शिक्षक कर्मच्याऱ्यांना दिर्घ सुट्टी असते. शासन निर्णय क्र. वाहन 2009/प्र.क्र.78/सेवा-5 दि.05/04/2010 मधील मुद्दा क्र. 4 नुसार 30 दिवसापेक्षा अधिक अनुपस्थितीच्या कालावधीसाठी वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही असे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार माहे मे 2021 व मे 2022 ह्या महिन्याचे वेतना (प्रत्यक्ष अदा अनुक्रमे जून 2021 व जून 2022) मध्ये वाहतूक भत्ता रक्कम नियम बाह्यपणे परिगणित करुन एकुण स्थूल वेतन अदा केलेले आहे. त्यामुळे जादा प्रदान रक्कम अनुक्रमे मे 2021 मधील रु.59,600/- व मे 2022 मधील रक्कम रु.62,400/- अशी एकुण 1,22,000/- जादा प्रदान रक्कम संबधित शिक्षकांकडून वसुल करुन त्यापैकी 50% रक्कम रु.61,000/- शासन जमा करुन व 50% रक्कम रु.61,000/- मनपा फंडात जमा करुन लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

- आक्षेपाधिन रक्कम रु.61000/- (मनपा निधी 50%)
  - कायम स्वरूपी अमान्य रक्कम 61000/- (शासन निधी 50%)
  - एकुण वसुलपात्र रक्कम रु.1,22,000/-

परिच्छेद क्र.17.5:- भविष्य निर्वाह निधी ठेवीवरील प्राप्त व्याज व वर्गणी धारकांना देय्य व्याज रक्कम ह्या मधील तफावती बाबत..

शिक्षण विभागातील मिरा भाईंदर महानगरपालिका येथील शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 वर्गणीदारांच्या वेतनातून कपात होणारी भविष्य निर्वाह निधी रक्कम गुंतवणूक पोटी वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधी करीता किती व्याजाची रक्कम प्राप्त झालेली आहे व भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना वित्त् वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधी करीता किती व्याजाची रक्कम देय्य आहे, त्यानुसार व्याजाची प्राप्त होणारी रक्कम व व्याजाची देणे रक्कम या मधील तफावत ह्या बाबतचे अभिलेखे नोंदी अपूर्ण असल्याने पडताळणी करता आलेली नसल्याने सदर तफावत रक्कमेच्या दायित्व बाबत लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदविता येत नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.6:- भविष्य निर्वाह निधी अभिलेख अनियमितता बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या शिक्षक प्रवर्गाच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यासाठी महाराष्ट्र सर्व सामान्य भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 6(1) अन्वये वर्गणीदारांचे लेखे प्रत्येक वर्गणी दाराच्या नावे खाते उघडून नियम 12 प्रमाणे त्यावरील व्याज रक्कमेची परिगणना करून लेजर अकाऊंट प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर लेखे परिपूर्ण करणे आवश्यक असताना बहुतांश वर्गणी दारांची परिपूर्ण नोंदी घेतलेल्या नसल्याची व्याजाच्या रक्कमेची परिगणना पडताळणी करुन जमा रक्कमे बाबत पडताळणी करता आलेली नाही. नमुना नं. 98 (भविष्य निर्वाह निधी खातेवही मधील निवडक उदाहरणे खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहेत :-

GPF A/C भविष्य निर्वाह निधी खातेवही

2020-2021

अ.क्र.	GPF खातेदाराचे नाव	GPF A/C	नोंदवही पृष्ठ क्रमांक	तपशिल
1.	ममता हेमंत पिंपळे	01	01	नोंदी अपूर्ण, परिगणना केलेली नाही
2.	सुधाबेन टेलर	36	07	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
3.	प्रिया हेंमत ठाकूर	47	09	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत

4.	कॅथरीन ग्रेशस	49	10	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
5.	प्राची पाटील	50	11	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
6.	मेघा वर्तक	49	12	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
7.	संध्या म्हात्रे	42	13	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
8.	अनघा अ. वर्तक	54	15	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
9.	जॅकलीन लोपीस	62	18	नोंदी अपूर्ण, परिगणना केलेली नाही
10.	टेरेझा डिसोझा	63	19	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
11.	इजाबेत परेरा	64	20	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
12.	अनिता पांगारकर	65	21	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
13.	हेमांगी पाटील	72	23	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
14.	अंजिलीन रॉडिग्ज	73	24	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
15.	रुबी घोन्सालवीस	74	25	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
16.	राजेश्री त्रिभुवन	75	26	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
17.	पल्लवी वर्तक	104	30	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
18.	वर्षा व. संखे	107	31	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
19.	वंदना देसाई	121	32	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
20.	भारतीबेन पटेल	122	33	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
21.	वनिता पिंपळे	131	34	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
22.	सशी शर्मा	132	35	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
23.	रमाकांत चौबे	133	36	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
24.	मंजुळा कोठारी	134	37	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
25.	पूनम मेंगाळ	135	38	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
26.	सिंह अरूण कुमार	136	39	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
27.	नाव नोंदविलेले नाही	142	45	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
28.	नाव नोंदविलेले नाही	143	46	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
29.	नाव नोंदविलेले नाही	144	47	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
30.	निलम सावे	151	48	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
31.	इजाबेन फोन्सेको	152	49	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
32.	रेखा संखे	161	50	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत
33.	अरुणा वर्तक	162	51	नमुना नं. 98 नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत

GPF A/C भविष्य निर्वाह निधी खातेवही

2021-2022

अ.क्र.	GPF खातेदाराचे नाव	GPF A/C	नोंदवही पृष्ठ क्रमांक	तपशिल
1.	पुष्पा तामोरे	205	82	नमुना नं.98 पष्ठ 82 कोरे
2.	कल्पना वडिले	206	83	परिगणना केलेली नाही
3.	वनिता आहिरे	208	85	परिगणना केलेली नाही
4.	जागृती राऊत	209	86	परिगणना केलेली नाही
5.	ताहिरा सय्यद	210	87	परिगणना केलेली नाही
6.	कचरु किशन कचरे	214	91	नमुना नं.98 पृष्ठ 91 कोरे
7.	सकू हिरामण खडके	216	93	परिगणना केलेली नाही
8.	ममता यादव	218	95	परिगणना केलेली नाही
9.	अनिल कुमार मिश्रा	नमुद नाही	99	नमुना नं.98 पृष्ठ 99 कोरे
10.	मधुकर धारवड	225	102	परिगणना केलेली नाही
11.	नंदा सुधीर रवरात	226	103	परिगणना केलेली नाही
12.	मंदाकिती लामखडे	227	104	परिगणना केलेली नाही
13.	नाव नमुद नाही	228	105	नोंदी नाहीत
14.	नाव नमुद नाही	229	106	नोंदी नाहीत
15.	स्नेहल सचिन संखे	230	107	परिगणना केलेली नाही
16.	एकनाथ बाबळे	231	108	परिगणना केलेली नाही
17.	नाव नमुद नाही	236	113	नमुना नं.98 पृष्ठ 113 कोरे
18.	नाव नमुद नाही	237	114	नमुना नं.98 पृष्ठ 114 कोरे
19.	प्रभावती पारले	238	115	परिगणना केलेली नाही
20.	संध्या देसाई	240	117	परिगणना केलेली नाही
21.	कल्पना गुप्ता	239	116	नमुना नं.98 पृष्ठ 116 कोरे
22.	भावना राजाराम रडेडर	259	136	परिगणना केलेली नाही
23.	पुष्पा नंदकिशोर गुप्ता	260	137	परिगणना केलेली नाही
24.	सविता आव्हाड	272	149	परिगणना केलेली नाही
25.	मिनल पिंपळे	273	150	परिगणना केलेली नाही
26.	शीला केतन तन्ना	274	151	परिगणना केलेली नाही
27.	हेमीना किशोर संपत	275	152	परिगणना केलेली नाही
28.	प्रिती मुकेश पटेनिया	276	153	नमुना नं.98 पृष्ठ 153 कोरे

29.	नयना बेन जोशी	286	163	परिगणना केलेली नाही
30.	समीता मुकादम	288	165	परिगणना केलेली नाही

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 466(5) परिशिष्ट-5 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे तथापि या नुसार कार्यवाही करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणास निर्देशनास आलेले आहे.
2) बृहत पत्राप्रमाणे 31 मार्च 2021 व 31 मार्च 2022 अखेर जमा/ खर्चाचा लेखा अद्यावत करण्यात आलेला नाही. त्यामुळे 31 मार्च 2021 व 31 मार्च 2022 अखेर बँक खाते प्रमाणे व कॅशबूक प्रमाणे अखेरची शिल्लक बाबत ताळमेळ घेता आलेला नाही.
3) सर्व भविष्य निर्वाह निधी खातेदाराच्या व्याजाची परिगणना वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 साठी करण्यात आलेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.7:- कॅश बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसल्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणास खालील नमुद अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

1) जनरल कॅश बूक
2) भविष्य निर्वाह निधी कॅशबूक
3) गुंतवणूक नोंद वही.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 105 (2) अन्वये लेखापरीक्षणास अभिलेखे सादर करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न झाल्याने लेखापरीक्षणास जनरल कॅश बुक उपलब्ध झालेली नाहीत.
2) कॅश बुक उपलब्ध न झाल्याने नोंदीची पडताळणी करून ताळमेळ घेता आलेला नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.8:- वेतन / निवृत्ती वेतन अनुदान नोंदवही ठेवण्यात न आल्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील शिक्षण प्रवर्गाच्या वेतनासाठी व निवृत्ती वेतनासाठी 50% अनुदान शासनाकडून व 50% अनुदान रक्कम महानगरपालिकेमार्फत वितरीत केली जाते.

वित्त वर्ष 2020-2021 च 2021-2022 ह्या वर्षाच्या लेखापरीक्षणात वेतन व निवृत्ती वेतन अनुदान नोंदवाहीची तपासणी करीता अभिलेखाची मागणी केली असता अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणात निर्देशनास आलेले आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 62,315,317,450 अन्वये नमुना नंबर 26 मध्ये अनुदान नोंदवही ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने ह्या बाबत पडताळणी करता आलेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.9:- थकित शाळा गृह भाडे बाबत.

शासन परिपत्रक क्र. प्रा.शा.भा. मंत्रालय दि.21/01/2001 नुसार मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 मधील नियम 15 (अ) (3) अन्वये नगरपालिका शिक्षण मंडळाने प्राथमिक शिक्षणाकरीता भाडयाने घेतलेल्या इमारतीचे भाडे पोटी 50% अनुदान रक्कम अनुज्ञेय आहे. त्यानुसार सदर भाडे रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना देय आहे.

तसेच कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचे प्रमाणपत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत 17 महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीचे भाडे 50% अनुदान रक्कमेप्रमाणे 19,34,136/- इतक्या रक्कमेस शाळा गृह भाड्यास शासना कडून मान्यता मिळालेली आहे, त्यानुसार शि.उप.स/प्राथ/प्रशिम/अनु/08-09/42336/43 दि.14/11/2006 अन्वये 50% अनुदान रक्कम या पूर्वी प्राप्त झालेली आहे.

तरी वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या वर्षाची थकित भाडे रक्कम व या पूर्वीची थकित भाडे रक्कमेसह शासनाकडे मागणी करुन पूर्तता दर्शवावी.

मागणी क्र. ई-2 लेखाशिर्ष 22002 सर्वसाधारण शिक्षण 01 प्राथमिक शिक्षण
103 इतर स्थानिक संस्थाना अनुदाने
(2202028) 31.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.17.10:- भविष्य निर्वाह निधी खात्यातील अखेरच्या शिल्लक रक्कमे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 ह्या कालावधीतील बँक खात्यातील पास बुक प्रमाणे अखेरच्या शिल्लक रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	निधीचे नाव	खाते क्रमांक	बँक पासबूक प्रमाणे अखेरची शिल्लक रक्कम
1.	2020-2021 (31 मार्च 2021 अन्वये)	GPF	009271	11,49,891/-
2.	2021-2022 (31 मार्च 2022 अन्वये)	GPF	009271	72,01,590/-

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) भविष्य निर्वाह निधीचे कॅशबुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसल्याने प्रत्यक्ष बँक खाते मधील शिल्लक रक्कम व कॅशबुक मधली शिल्लक रक्कम या बाबत ताळमेळ घेता आलेला नाही. तरी या बाबत लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.11:- शिक्षण विभागातील वार्षिक जमा खर्चा मधील अनियमितता बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत शिक्षण विभागाचे वार्षिक जमा-खर्च (नमुना नं 27) अहवाल मधील विवरण खालीलप्रमाणे आहे :-

वार्षिक जमा अहवाल सन 2020-2021

अ.क्र.	लेखाशिर्ष	कोड नं.	तरतूद प्रत्यक्ष जमा	उर्वरित रक्कम
1.	50% शासन वेतन अनुदान	3110	-	-
2.	मनपाकडून हस्तांतरण	-	-	-

वार्षिक जमा अहवाल सन 2020-2021

अ.क्र.	लेखाशिर्ष	कोड नं.	तरतूद प्रत्यक्ष जमा	उर्वरित रक्कम
1.	स्थायी अस्थापना	3110	37.00 लाख	-
2.	50% मनपाकडून शिक्षण वेतन	-	202 लाख	176.53 लाख

वार्षिक खर्च अहवाल सन 2021-2022

अ.क्र.	लेखाशिर्ष	कोड नं.	तरतूद	खर्च (आकडे लाखात)
1.	50% शासन वेतन अनुदान	3110	-	-
2.	मनपाकडून हस्तांतरण	-	-	-

वार्षिक खर्च अहवाल सन 2021-2022

अ.क्र.	लेखाशिर्ष	कोड नं.	तरतूद	खर्च (आकडे लाखात)
1.	स्थायी अस्थापना	3110	40.00 लाख	-
2.	50% मनपाकडून शिक्षण वेतन	-	1100 लाख	134 लाख

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 करिता खालीलप्रमाणे 50% महानगरपालिका अनुदान व 50% शासन अनुदान रक्कम बँक खाते पासबुक नुसार जमा झालेली दिसुन येते.

अ.क्र.	वर्ष	50% शासन अनुदान रक्कम	50% मनपा अनुदान रक्कम
1.	2020-2021	253.375 लाख	1244.042 लाख
2.	2021-2022	133777.78 लाख	10577.7775 लाख

तथापि वार्षिक जमा खर्च अहवालात जमा रक्कमेच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या नसल्याने वार्षिक जमा / खर्च अहवाल सदोष आहे. तरी या बाबत लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.12:- शासन अनुदान 50% व महानगरपालिका अनुदान 50% बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाच्या वेळी शिक्षकांचे वेतन व निवृत्ती वेतन साठी शासन अनुदान 50% व महानगरपालिका अनुदान 50% हे विशिष्ट प्रकल्प, योजना किंवा विशिष्ट खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपातील कामे पार पाडण्यासाठी किंवा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण प्रयोजनासाठी अशी अनुदाने वितरीत केली जातात. अशी प्राप्त झालेली अनुदाने सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमुद करण्यात आलेली आहेत. सदरची प्राप्त झालेली अनुदाने ही बँक स्टेटमेंट वरुन घेण्यात आलेली आहेत.

शिक्षण विभाग सन 2020-2021 चे 50% महानगरपालिका अनुदानाचे विवरण

अ.क्र.	दिनांक	50%महानगरपालिका अनुदान शासन अनुदान	अ.क्र.	दिनांक	50% शासन अनुदान
1.	20/03/2020	5019453/-	1	20/04/2020	1326074/-
2.	27/05/2020	6544714/-	2	20/04/2020	5373811/-

3.	04/06/2020	5224322/-	3	23/04/2020	1563432/-
4.	04/06/2020	240970/-	4	23/04/2020	5257771/-
5.	07/07/2020	5144979/-	5	07/08/2020	5115136/-
6.	07/07/2020	1563432/-	6	07/08/2020	1563432/-
7.	08/07/2020	96580/-	7	04/01/2021	5137891/-
8.	16/09/2020	10000000/-	-	-	-
9.	14/08/2020	305810/-	-	-	-
10.	24/08/2020	1660551/-	-	-	-
11.	24/08/2020	5240445/-	-	-	-
12.	21/09/2020	15000000/-	-	-	-
13.	29/09/2020	2967618/-	-	-	-
14.	29/09/2020	5211961/-	-	-	-
15.	01/10/2020	1041136/-	-	-	-
16.	27/10/2020	1651749/-	-	-	-
17.	27/10/2020	5168351/-	-	-	-
18.	16/12/2020	18588153/-	-	-	-
19.	16/12/2020	1711937/-	-	-	-
20.	20/01/2021	10063271/-	-	-	-
21.	16/02/2021	5847006/-	-	-	-
22.	05/03/2021	5137891/-	-	-	-
23.	12/03/2021	5608170/-	-	-	-
24.	26/03/2021	5365732/-	-	-	-
	एकुण	**124404231/-**		**एकुण**	**25337547/-**

शिक्षण विभाग सन 2021-2022 चे 50% शासन अनुदान व 50%महानगरपालिका अनुदानाचे विवरण

अ.क्र.	**दिनांक**	**50%महानगरपालिका अनुदान शासन अनुदान**	**अ.क्र.**	**दिनांक**	**50%** शासन अनुदान
1.	05/04/2021	9883460/-	1.	29/04/2021	1681660/-
2.	30/04/2021	1794148/-	2.	29/04/2021	7144088/-
3.	19/07/2021	7000000/-	3.	30/04/2021	25310779/-
4.	12/08/2021	7500000/-	4.	14/05/2021	5110203/-
5.	16/09/2021	10000000/-	5.	04/06/2021	5110203/-
6.	01/11/2021	19000000/-	6.	04/06/2021	7752181/-

7.	07/12/2021	15000000/-	7.	14/06/2021	1690945/-
8.	03/01/2022	26337284/-	8.	22/06/2021	4943456/-
9.	02/02/2022	9262608/-	9.	28/07/2021	5147079/-
10.	-	-	10.	29/07/2021	1718167/-
11.	-	-	11.	27/08/2021	5301504/-
12.	-	-	12.	22/09/2021	1671242/-
13.	-	-	13.	05/10/2021	8103545/-
14.	-	-	14.	21/10/2021	1687253/-
15.	-	-	15.	21/10/2021	5301504/-
16.	-	-	16.	02/12/2021	2842679/-
17.	-	-	17.	02/12/2021	5749715/-
18.	-	-	18.	16/03/2022	7120866/-
19.	-	-	19.	05/10/2021	1681247/-
20.	-	-	20.	05/10/2021	5301504/-
	-	-	21.	16/03/2022	2114076/-
	-	-	22.	31/03/2022	21293947/-
	एकुण	**10,57,77,500/-**		**एकुण**	**13,37,77,843/-**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) शिक्षण विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 315 नुसार नमुना नंबर 26 मध्ये अनुदान नोंदवही ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे प्राप्त अनुदानाची लेखाशिर्ष निहाय पडताळणी करता आली नाही.
2) प्राप्त झालेले अनुदानाची रक्कम विशिष्ठ प्रयोगनासाठी असल्यास महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 नियम 316 नमुना नं.39 मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक अनुदानाचा बाबतीत स्वतंत्र बँक खाते ठेवणे आवश्यक आहे.
3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 नियम 322 नुसार अनुदानाच्या रक्कमपैकी खर्च करण्यात आलेली कोणतीही रक्कम याची महाराष्ट्र लेखा संहिता 2013 प्रकरण 10 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दती नुसार लेखा पुस्तकामध्ये (Cash Book) नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु रोकडवही न ठेवल्यामुळे अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 नियम 317 मध्ये नमुद केले नुसार प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या अनुदानाची जेव्हा जेव्हा अनुदानाच्या संबंधात मंजूरी आदेश वितरीत झाल्यानंतर अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर किंवा प्राप्त होणार असेल अशा परिस्थितीत

लेखा प्रमुखाकडून नमुना 26 मध्ये नोंदवही ठेवून रोकडवहीला (Cask Book) नोंद घेणे आवश्यक आहे अशी कार्यवाही रोखवही न ठेवल्यामुळे करण्यात आलेली नाही.

5) शासन अनुदान 50% पैकी किती अनुदान शासनाकडून येणे आहे याबाबत सदर दोन्ही विवरण पत्रावरुन पडताळणी करता आली नाही त्यामुळे किती अनुदान येणे आहे याची खात्री करता आली नाही.
6) महानगरपालिकेकडून 50% अनुदाना पैकी कोणत्या वर्षात किती अनुदान येणे आहे याची खात्री करता आली नाही.

वरील सर्व आक्षेपांची पुर्तता करुन लेखापरीक्षणास पुर्ततेसह अनुपालन सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र.17.13:- शिक्षकांच्या सेवापुस्तकातील अनियमितता बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या वित्त वर्षाचे लेखा परीक्षण करताना खालील नमुद केलेल्या शिक्षकांच्या सेवा पुस्तकामध्ये खालील अनियमितता आढळून आल्या. सदर अनियमिततेचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावेत.

1) श्रीमती. समिधा शैलेश जाधव - उपशिक्षिका

1) सेवा पुस्ताकाच्या पहिल्या पृष्ठावर वैद्यकिय तपासणी अहवालाची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच शैक्षणिक अर्हता प्रमाणित केलेली नाही.
2) सेवा पुस्तकाला पृष्ठ क्रमांक (पृष्ठांकन) नोंदविण्यात आलेले नाहीत.
3) श्रीमती. समिधा शैलेश जाधव, उपशिक्षिका यांना दि.30/07/2009 ते 09/10/2009 पर्यंत एकुण 72 दिवस बाल संगोपन रजा आदेश क्र.105/697/27/07/2009/30/07/2009. अन्वये मंजूर असून नोंद प्रमाणित केलेली नाही. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-2017/प्र.क्र.25/सेवा-6 दि.23/07/2018 मधील Xiv नुसार दिलेल्या विहीत नमुण्यात सेवापुस्तका मध्ये उपभोगलेल्या बाळ संगोपन रजेची नोंद घेणे आवश्यक आहे. अशी नोंद घेतलेली नाही.
4) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबतची नोंद सेवा पुस्तकात नमुद नाही.

2) सौ. प्रभावती बाळकृष्ण पारले - उपशिक्षिका

1) रजा लेखा नोंदी परिपूर्ण नाही.
2) सेवा पुस्तकाला पृष्ठांकन केलेले नाही.
3) MS-CIT कोर्स पूर्ण केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात नमुद नाही.

3) श्रीमती. प्रमिला गोपाळ गावडे - उपशिक्षिका

1) सेवा पुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावर वैद्यकिय तपासणी अहवालाची नोंद नाही.

2) सेवा पुस्तकामध्ये पोट जातीचा उल्लेख नाही फक्त धर्माचा उल्लेख हिंदु असे नमुद आहे.

3) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबतची नोंद सेवा पुस्तकात नमुद नाही.

4) श्रीमती. अर्चना आल्वीन परेरा - उपशिक्षिका

1) वैद्यकिय तपासणी अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्राधिकारा ऐवजी वैद्यकि अधिकारी, महानगरपालिका दवाखाना, ठाणे यांचे कडील आहे.

2) अर्जित व परावर्तित रजेच्या नोंदी अद्यावत नाहीत.

3) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबत सेवा पुस्तकात नोंद नाही.

5) कु. जयश्री रामचंद्र मोरे - प्राथमिक शिक्षिका

1) सेवा पडताळणी अभिलेख सन 2009 नंतर अद्यावत केलेला नाही.

2) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबत सेवा पुस्ताकात नोंद नाही.

6) सौ. सविता रविंद्र आव्हाड - प्राथमिक शिक्षिका

1) चारित्र्य पडताळणी बाबत सेवापुस्तकात नोंद नाही.

2) जात पडताळणी बाबत सेवा पुस्तकात नोंद घेतलेली नाही. (हिंदु-वंजारी)

7) सौ. स्मिता राजाराम बोलाईकर - उपशिक्षिका

1) जन्म तारीख प्रमाणित केलेली नाही.

2) शैक्षणिक अर्हता बाबत संबंधित अधिकाऱ्याने प्रमाणित केले नाही.

3) वैद्यकिय तपासणी अहवाल नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

4) कार्यालय प्रमुखाने किंवा इतर सक्षम अधिकाऱ्याने सेवा पुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील सर्व नोंदी पुन: साक्षांकित केल्या बाबतचे प्रमाणपत्र स्वाक्षरी केलेली नाही.

5) सेवा पडताळणी अभिलेख अपूर्ण असून दि.01/04/2013 अखेर पर्यंत नोंदविला आहे.

6) चारित्र्य पडताळणी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

7) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबत सेवा पुस्ताकत नोंद नाही.

8) सौ. भावना राजाराम रेडकर - सहाय्यक शिक्षिका

1) वैद्यकिय अहवालाची नोंद (जिल्हा शल्य चिकित्सक) सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही. तसेच सेवा पुस्ताकाच्या प्रथम पृष्ठक्रमांकावर सुध्दा घेतलेली नाही.

2) चारित्र्य पडताळणी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

3) MS-CIT कोर्स पूर्ण केलेबाबत सेवापुस्ताकात नोंद घेण्यात आलेली नाही.

9) श्रीमती. जॉयसी जॉन लोपीस

1) MS-CIT कोर्स पूर्ण केले बाबत किंवा सुट दिले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

2) सेवा पडताळणी नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

वरील सर्व त्रुटी/ अनियमितता पूर्ण करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र.17.14:- साठा नोंदवही बाबत.

शिक्षण विभाग मिरा भाईंदर महानगरपालिकाकडे साठा नोंदवही लेखापरीक्षणासाठी मागणी केली असता दोन्ही वर्षाची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नसल्याने याबाबत साठा नोंदवहीची पडताळणी करुन त्यावर अभिप्राय देता आलेले नसल्याने शिक्षण विभागाने लेखापरीक्षणास साठा नोंदवही उपलब्ध करून देवून पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.15:- जडसंग्रह नोंदवही बाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 वित्तीय वर्षाचे जडसंग्रह नोंदवही अर्धसमास पत्र क्रमांक 1 दि.30/05/2023 अन्वये मागणी केली असता सदर जडसंग्रह नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाकडे असलेल्या जडसंग्रह नोंदवहीची पडताळणी करता आली नाही. तरी सदर नोंदवही मध्ये परिपुर्ण नोंदी घेऊन लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

तसेच सदर जडसंग्रह साहित्याचा प्रत्येक वर्षाचा घसारा काढून लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र.17.16:- बँक खाती रोख रक्कम भरणा केले बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व 2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता खालील विवरणामध्ये दर्शविल्या प्रमाणे रोख रक्कम शिक्षण विभागाच्या खात्यामध्ये जमा झाल्याचे दिसून येते त्या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	दिनांक	तपशिल	रक्कम
1.	02/02/2022	रोख रक्कम जमा	60,000/-
2.	08/02/2022	रोख रक्कम जमा	1,20,000/-
3.	18/02/2022	रोख रक्कम जमा	40,000/-
4.	17/03/2022	रोख रक्कम जमा	41,660/-
		एकुण रक्कम	**2,61,660/-**

याबाबत खालीलप्रमाणे आभिप्राय आहेत :-

1) सदर जमा करण्यात आलेल्या रकमांचे सामान्य पावत्या लेखा परीक्षणात उपलब्ध झालेल्या नाहीत.

2) सदरच्या रक्कमा या महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 चे नियम 226 नुसार ज्या दिवशी बँकेत रक्कम जमा करण्यात आली त्याच दिवशी त्याची नोंद करण्यात आली असताना सदरच्या रक्कमा कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा झाल्या याबाबत लेखा परीक्षणास अवगत करण्यात यावे.
3) सदर जमा रक्कमांचे चलन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.
4) रोखवही (Cash Book) उपलब्ध न झाल्याने जमा रक्कमेच्या नोंदीची पडताळणी करता आली नाही.

सदर आक्षेपांची पुर्तता करुन लेखापरीक्षणास पुर्ततेसह अनुपालन सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र.17.17:- निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतनाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणा मध्ये निवृत्त वेतनधारक सुधाबेन देसाई मयत दिनांक 27/04/2021 कुटूंब निवृत्त वेतन धारक कानुभाई देसाई मयत दिनांक नोंद नाही परंतु माहे जून 2022 मध्ये निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्ती वेतन नमुना नोंदवही नमुना नंबर 101 ला मयत असे नोंदविण्यात आले आहे. तथापि मयत दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. तथापि त्या कुटूंबाला खालीलप्रमाणे कुटूंब निवृत्ती वेतन अदा करण्यात आले आहे.

अ.क्र.	माहे	रक्कम
1.	ऑगस्ट 2021	16,240/-
2.	सप्टेंबर 2021	16,240/-
3.	ऑक्टोबर 2021	16,240/-
4.	नोव्हेंबर 2021	18,533/-
5.	डिसेंबर 2021	18,533/-
6.	जानेवरी 2022	18,533/-
7.	फेब्रुवारी 2022	18,533/-
8.	मार्च 2022	18,533/-
9.	एप्रिल 2022	18,937/-
10.	मे 2022	18,937/-
11.	जुन 2022 दिवस 6	9,484/-
	एकुण	**1,88,803/-**

याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

1) निवृत्त वेतन धारक सुधाबेन देसाई मयत दि.27/04/2021 नंतर कुटूंब निवृत्त वेतन निश्चिती करुन कुटूंब निवृत्त वेतन अदा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

2) कुटूंब निवृत्ती वेतन निश्चिती करुन जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम वसुल करुन अनुपालनासह लेखापरीक्षणास अवगत करावे.

परिच्छेद क्र.17.18:- बँक खाते बंद केलेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करताना दि.30/11/2021 खाते क्र.446442363 हे खाते बंद करुन खाते क्र.446429374 इंडियन बँक मध्ये रक्कम रु.12,155/- वर्ग करण्यात आले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

1) सदर खात्याचे तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.
2) सदर खाते बंद करण्याकरीता ठराव मा. आयुक्त व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आदेश लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.
3) सदर बंद खात्याचे त्यावेळचे पासबुक/ बँक स्टेटमेंट उपलब्ध झालेले नाहीत त्यामुळे सदर खाती अखेरची शिल्लक रक्कमेबाबत पडताळणी करता आलेली नाही. तरी लेखापरीक्षणास अनुपालनासह पुर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.19:- अनुदान जमा बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करता दि.18/03/2021 रोजी रक्कम रु.16,71,602/- हे लेखा अधिकारी यांचे कडून हस्तांतरीत जमा झालेले बँक स्टेटमेंट वरुन दिसून येते. परंतु प्रत्यक्षात ते शासनाकडून प्राप्त झाल्याचे नोंदी दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे सदर अनुदान हे कोणाकडून आणि कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा झालेत याची खात्री पटविणे आवश्यक आहे. तरी या बाबत लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.20:- अखेर शिल्लकेच्या ताळमेळ बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 लेखापरीक्षण केले असता दि. 31/03/2021 अखेरची शिल्लक रक्कम रु.85,60,383/- बँक स्टेटमेंट प्रमाणे असून दि.31/03/2022 अखेरची शिल्लक रक्कम रु.2,45,04,811/- बँक स्टेटमेंट प्रमाणे दिसुन येते. सदर शिल्लके बाबत रोखवही (Cash Book) उपलब्ध नसल्याने शिल्लके बाबत खात्री/ पडताळणी करता आलेली नाही. तरी रोखवही (Cash Book) उपलब्ध करुन अखेर शिल्लकेचा ताळमेळ घेऊन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.17.21:- आयकर भरणा बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे आयकर भरणा बाबतचे लेखे तपासले असता सन 2021-2022 या आर्थिक वर्षाचे आयकर रक्कम रु. 48,60,820/- कपात केल्याचे विवरण पत्रावरुन दिसून आले सदर रक्कम शासनाकडे भरणा केले बाबतचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच सदर रक्कम रु.48,60,820/- रोखवहीला जमा असले बाबत रोखवही उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही.

तसेच सन 2020-2021 या वित्तीय वर्षाचे आयकर कपात केले बाबत रोखवही उपलब्ध न केल्याने कपात केली असले बाबतची खात्री करता आली नाही.

तरी सदर सन 2020-2021 व 2021-2022 या दोन्ही वर्षाची रक्कम शासन खाती भरणा केलेचे चलन तसेच सदर चलन कोषागार कार्यालयाकडून पडताळणी करुन लेखापरीक्षणास अनुपालनाच्या पुर्ततेसह सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र.17.22:- व्यवसाय कर शासन खाती भरणा करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या दोन्ही आर्थिक वर्षामध्ये व्यवसाय कर वेतनातून कपात करणे आवश्यक असताना शिक्षण विभागाने सन 2021-2022 या आर्थिक वर्षात रक्कम रु.3,43,900/- एवढा कपात केलेचे त्यानी दिलेल्या विवरण पत्रावरुन दिसून येते.

याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

1) सन 2020-2021 या वित्तीय वर्षाचा व्यवसाय कर कपात केले बाबतचे विवरण पत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.
2) सन 2020-2021 या आर्थिक वर्षाचे रोखवही उपलब्ध केली नसल्याने सदर रक्कम कपात केली असल्याची पडताळणी करता आली नाही.
3) सन 2020-2021 व 2021-2022 या दोन्ही आर्थिक वर्षाची रक्कम शासनाकडे भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाहीत.
4) सदर दोन्ही वर्षाचे सन 2020-2021 व 2021-2022 ची चलने कोषागार कार्यालयाकडून पडताळणी करुन लेखापरीक्षणास अवगत करण्यात यावे.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन पुर्ततेसह लेखापरीक्षणास अनुपालन सादर करण्यात यावे.

विवाह नोंदणी विभाग

परिच्छेद क्र.18.1:- विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीतील अनियमितता बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग 02** मधील वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 हया कालावधीतील विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीची लेखापरीक्षण कालावधीत तपासणी केली असता खालीलप्रमाणे "आय" नोंदवहीतील नोंदीमध्ये अनियमितता आढळून आलेल्या त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	नमुना "आय" मधील अनु क्र.	नमुना "आय" नोंदवहीतील पृष्ठ क्र.	पती/ पत्नीचे नाव	नमुना "आय" मधील अपूर्ण नोंदी तपशिल
1.	14	05	शाह यश कमलेश / कोरडिया चार्मी राकेश	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.
2.	18	06	चव्हाण विशाल कुमार / महेश भाई	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.
3.	23	08	सोनेथा जयेशकुमार हसमुखलाल / शेट मानिका दिलीप	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.
4.	36	12	मनियार अमर गुणवंत / शाह विशाली रमेश कुमार	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.
5.	48	16	वधुचे नाव- टोरका प्रियंका रामभजन	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.
6.	80	27	धानुका राहूल अरुण / अग्रवाल प्रिती सुनिल	वधू/ वराचे विवाह वेळचे त्यांचे वय रकाना क्र.4 मध्ये नमुद नाही.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम 1998 नुसार व विवाह नियम 1999 नुसार विवाह नोंदणी बाबत मार्गदर्शक सुचना नुसार विहित केलेल्या नमुन्यातील रकाना निहाय माहिती नोंदविणे आवश्यक आहे. तरी अपूर्ण नोंदीबाबत लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.
2) मासिक / वार्षिक विवाह नोंदणी गोषवारा काढण्यात आलेला नाही. तसेच नोंदवही प्रमाणित करण्यात आलेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.18.2:- विवाह नोंदणी शास्तीची रक्कम शासन जमा न केल्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग क्र.02** मधील वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 हया कालावधीमधील विवाह नोंदणी नोंदवहीची लेखापरीक्षणात लेखापरीक्षण केले असता महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम 1998 सुधारीत 21/11/2006 कलम 6(2) व (3) व आरोग्य सेवा संचालनालय महाराष्ट्र यांचे परिपत्रक जा.क्र. संआ से/ विवाह नोंदणी कक्ष 18/3863-78/16 दिनांक 21/04/2016 मधील विवाह नोंदणी बाबत मार्गदर्शन सुचना क्र.5 नुसार विवाह झाल्यानंतर 1 वर्षाहून व त्याहून अधिक कालावधी होऊनही विवाह नोंदणी न केल्यास अशा विवाह नोंदणी करणे आवश्यक आहे. व त्या प्रमाणे प्रभाग 02 यांनी वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 करीता जी शास्ती रक्कम उशिरा विवाह नोंदणी शास्ती लावून वसूल केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) विवाह नोंदणीद्वारे जमा होणारी शास्ती रक्कम कलम 6(2)(3) चे नियम 7(1)(2) नुसार संकलन होणारी शास्तीची रक्कम शासनाकडे नमुद लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी लेखापरीक्षणास पूर्ततेसह अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
मुख्य लेखाशिर्ष- 0030
उपशिर्ष- 03
उपगौण लेखा-800
इतर जमा- 00300161
06 विवाह अधिनियम अन्वये वसुल शुल्क

परिच्छेद क्र.18.3:- विवाह नोंदणी नोंदवही नमुना "आय" मधील अनियमतता बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग क्र.02** मधील विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीची वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 च्या लेखापरीक्षणात पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेली आहे.

1) आरोग्य सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे कडील परिपत्रक संआसे/ विवाह नोंदणी / कक्ष-18/3863-78/16 दिनांक 21/04/2016 परिपत्रकातील विवाह नोंदणीबाबत मार्गदर्शक सुचना क्र.16 नुसार विवाह नोंदवही नमुना "आय" मधील नमुन्यातील रकाना क्रमांक 10 मध्ये विवाह नोंदणी क्रमांक खंड क्रमांक व पृष्ठ क्रमांक नमुद करणे आवश्यक असताना "आय" नोंद वहीतील नमुन्यात रकाना क्रमांक 10 मध्ये अशा नोंदी प्रभाग क्रमांक 02 मार्फत घेण्यात आलेल्या

नाहीत तरी या बाबत पूर्तता अनुपालन दर्शवावे व या पुढे आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे नोंदी दर्शविण्याची दक्षता घेण्यात यावी.

परिच्छेद क्र.18.4:-विवाह नोंदणी नोंदवही नमुना "आय" मधील अनियमता बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग 06** मधील विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीची वित्त वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरिक्षणात पडताळणी केली असता या बाबत खालील प्रमाणे अनियमता आढळून आलेला आहेत.

1 आरोग्य सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे कडिल परिपत्रक संआसे/विवाह नोंदणी / कक्ष -18/3863-78/16 दिनांक 21-04-2016 परिपत्रकातील विवाह नोंदणीबाबत मार्गदर्शक सुचना क्र. 16 नुसार विवाह नोंदवही नमुना "आय" मधील नमुन्यातील रकाना क्रमांक 10 मध्ये विवाह नोंदणी क्रमांक खंड क्रमांक व पृष्ठ क्रमांक नमुद करणे आवश्यक असताना "आय" नोंद वहीतील नमुन्यात रकाना क्रमांक 10 मध्ये अशा नोंदी प्रभाग क्रमांक 6 मार्फत घेण्यात आलेल्या नाहीत तरी या बाबत पूर्तता अनुपालन दर्शवावे व या पुढील नोंदी आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे दर्शविण्याची दक्षता घेण्यात यावी

परिच्छेद क्र. 18.5:-विवाह निबंधक प्रधिकारा बाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग -6** येथील विवाह नोंदणी अभिलेखांची वित्त वर्ष 2020-2021 ते 2021-2022 हया कालावधी करिता लेखापरिक्षणात लेखापरिक्षण केले असता खालील नमूद केल्या प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

संचालक आरोग्य सेवा संचालनायक महाराष्ट्र राज्य यांचे जा. मु.संआसे/विवाह नोंदणी / कक्ष -18/3863-78/19 दि. 21-04-2016 चे परिपत्रकानुसार व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी नियम 1998 व महारष्ट्र विवाह मंडाळाचे विनियम आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील विवाह नोंदणी करिता आरोग्य अधिकारी यांना विवाह निबंधक म्हणून प्राधिकृत केलेले आहे. तथापि विवाह निबंधक म्हणुन प्रभाग अधिकारी स्वाक्षरी करीत आहेत.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.18.6:- विवाह नोंदणी शुल्क रक्कम जमा नसल्याबाबत ….

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग क्र. 6** चे विवाह नोंदणी शुल्क जमा रकमेची पावती पुस्तकानिहाय जमा रकमेची लेखापरिक्षणास तपासणी केली असता खालील नमूद केलेल्या पावतीव्दारे जमा झालेली रक्कम पोटकिर्द मध्ये समाविष्ठ केलेली नसल्याने सदरची रक्कम लेख्याबाहेर राहिलेली आहे.

पावतीनुसार जमा रक्कम तथापि पोटकिर्दमध्ये सामाविष्ठ नसलेल्या रकमेचा तपशिल पुढिल प्रमाणे

अ. क्र.	सामान्य पावती क्रमांक	दिनांक	पावतीप्रमाणे जमा रक्कम	तपशिल
1.	1560/155926	28/09/2020	150/-	विवाहनोंदणी सलमान माकनोजीच
2.	1560/155965	07/12/2020	150/-	जगताप सुनित प्रविण
3.	1560/155975	15/12/2020	150/-	सचिन म्हामुणकर
4.	1695/169408	11/01/2021	010/-	फार्म फी
	एकूण रक्कम रुपये		560/-	

या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील नियम 94 अन्वये प्राप्त झालेल्या रकमांच्या नोंदी पोटर्कीद रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि तपशिलात नमूद केलेली रकमेची नोंद पोटर्कीद कँश बूकात नोंद झालेली नसल्याने सदरच्या रकमा लेख्याबाहेर राहिलेल्या आहेत.

तरी सदरची कमी जमा रक्कम रु. 560/- रोकडवहीत जमा करुन लेखापरिक्षणात पूर्तता दर्शवावी

वसुलपात्र रक्कम रु. 560/-

मत्ता रक्कम रु. 560/-

परिच्छेद क्र.18.7:- विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीतील अनियमितता बाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत **प्रभाग 06** मधील वित्त वर्ष 2020-2021 व 2021-2022 हया कालावधीतील विवाह नोंदणी नमुना "आय" नोंदवहीची लेखापरिक्षण कालावधीत तपासणी केली असता खालील प्रमाणे "आय" नोदवहीतील नोंदीमध्ये अनियमितता आढळुन आलेल्या त्या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

वर्ष 2021-2022

अ. क्र.	नमुना "आय" मधील अनु क्र.	नमुना "आय" नोंदवहीतील पृष्ठ क्र.	पती पत्नीचे नाव	नमुना "आय" मधील अपूर्ण नोदी तपशिल
1.	23	07	समनानी सादिक समसुहाने करिबार नाघमा बरकतअली	पतीचा धर्म नोंद विण्यात आलेला नाही
2.	70	20	शारुख जामिल बारसी निता चुला खान	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.
3.	133	37	सोगिता रविबाबू भाई	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.
4.	136	38	भोईर विनायक विलास भाईर ऐश्वर्या अरविंद	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.
5.	201	54	कल्पेश भालचंद्र ठाकूर करिष्मा रमाकांत काढे	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.

वर्ष 2020-2021

अ. क्र.	नमुना "आय" मधील अनु क्र.	नमुना "आय" नोंदवहीतील पृष्ठ क्र.	पती पत्नीचे नाव	नमुना "आय" मधील अपूर्ण नोदी तपशिल
1.	09	03	प्रशांत प्रकाश सावंत दिपा अनिल सावंत	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.
2.	29	08	पांडे निलेश कुमार कन्हेयालाल शुक्ला अनमिका श्रीकृष्ण	पती / पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.
3.	45	12	कनसेजिया मनिष रमेश कनोजिया रिना रुपनारायव	पत्नीचे विवाह वेळीचे वय नोंदविल्यात आलेले नाही.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम 1998 नुसार व विवाह नियम 1999 नुसार विवाह नोंदणी बाबत मार्गदर्शक सुचना नुसार विहित केलेल्या नमुन्यातील रकाना निहाय माहिती नोंदविणे आवश्यक आहे. तरी अपूर्ण नोंदीबाबत लेखापरिक्षणास पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र. 18.8:- विवाह नोंदणी शास्तीची रक्कम शासन जमा न केल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत प्रभाग क्र. 6 मधील वित्त वर्श 2020/2021 व 2021-2022 हया कालावधीलतील विवाह नोंदणी नोंदवहीची लेखापरिक्षणात लेखापरिक्षण केले असता महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम 1998 सुधारीत 21/11/2006 कलम 6(2) व (3) व आरोग्य सेवा संचालनाय महाराष्ट्र राज्य हयांचे परिपत्रक जा. क्र. संआ से/ विवाह नोंदणी कक्ष 18/3863-78/16 दिनांक 21/04/2016 मधील विवाह नोंदणी बाबत मार्गदर्शन सुचना क्र. 5 नुसार विवाह झाल्यानंतर 1 वर्षाहुन व त्याहुन अधिक कालवधी होवूनही विवाह नोंदणी न केल्यास अशा विवाह नोंदणी करणे आवश्यक आहे. व त्या प्रमाणे प्रभाग 06 हयांनी वित्त वर्ष 2020/21 व 2021-22 करीता अनुक्रमे 15300/- व 2500/- शास्ती रक्कम उशिरा विवाह नोंदणी शास्ती म्हणुन वसूल केलेली आहे. हया बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

1. विवाह नोंदणीव्दारे जमा होणारी शास्ती रक्कम कलम 6(2)(3) व नियम 7(1)(2) नुसार संकलन होणारी शास्ती शासनाकडे नमूद लेखा शिर्षाखाली जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी लेखापरिक्षणास पूर्ततासह अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्षा मुख्य लेखाशिर्षा - 0030 उपलेखाशिर्षा -03 उपगौण लेखा - 800

इतर जमा - 00300161

06 विवाह अधिनियम अन्वये वसुल शुल्क

परिच्छेद क्र. 18.9:- विवाह नोंदणी जमा रकमेचा मासिक अहवाल सादर करणेबाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासह सर्व विवाह निबंधकाकडून विवाह नोंदणी जमा रकमेचा मासिक अहवाल संदर्भित परिपत्रक क्र.2 आताजिआ /कक्ष -82/विनो/ शुल्क जमा /1074-1137/ 17 दि. 18/01/2017 अन्वये महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग राज्य आरोग्य माहिती व जीवन विषयक आकडेवारी कार्यालय पुणे -1 हयांना खालील नमुन्यात आरोग्य अधिकारी महानगरपालिका हयांनी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल पाठविण्याची कसर्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावी.

अनु क्र.	वर्गीकरण	विवाह नोंदणी झालेली आकडेवारी								शासन जमा रक्कम							
		एकूण विवाह		अनुचित जात		अनुचित जमाती		BPL कार्डधारक		एकूण विवाह		अनुचित जात		अनुचित जमाती		BPL कार्डधारक	
		मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत	मासिक	प्रगत

वाहन विभाग

परिच्छेद क्र.19.1:- ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे या बाबतच्या कार्यादेशामधील अनियमितता बाबत..

1) कामाचे नाव - ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे
2) प्रशासकीय आदेश - ठराव क्र.94 दि.07/12/2021 मा. स्थायी समिती
3) निविदा प्रसिध्दी - दि.02/10/2021 ची फेर निविदा जाहिरात
    1) दै. परशुराम समाचार
    2) दै. नवभारत
    व ऑनलाईन -ई टेंडरिंग
4) कामाचा कालावधी - दि.01/01/2022 ते 31/12/2022 (एक वर्ष)
5) करारनामा - दि.16/12/2021
6) कामाचे कार्यादेश - मनपा/वाहन/249/2021-22 दि.30/12/2021
7) मक्तेदार - मे. सिक्युअर, सिक्युरीटी सर्व्हिस भुमीराज बिल्डर्स, शॉप नं.17 सेव्टर 20 खारघर नवी मुंबई 410210

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या वाहनांसाठी ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे कामी जाहिर निविदाद्वारे मागणी केलेली होती. त्यानुसार मक्तेदार मे. सिक्युअर, सिक्युरीटी सर्व्हिस यांनी सादर केलेली निविदा मंजुर केलेली आहे. सदर निविदा एक वर्षासाठी 121 वाहन चालक पुरवठा प्रतिवाहन चालक वेतन रु.23,963/- प्रतिमाह प्रमाणे मंजुर करुन कार्यादेश एक वर्षासाठी देण्यात आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) वाहन चालक पुरवठा मक्तेदारांकडून अटी/शर्तीत वाहन चालकाचे वाहन चालक परवाना बाबतचे कागदपत्राच्या स्वाक्षांकित Zerox प्रती महानगरपालिका कार्यालयात जमा करणे आवश्यक राहिल. याबाबतचा करारनाम्यात अटी/शर्ती नमुद केलेली नाही. तसेच वाहन चालकांचे वाहन चालक परवानाच्या साक्षांकित प्रती नस्ती सोबत लेखापरीक्षणास आढळून आलेल्या नाहीत.
2) वाहन चालकांनी कामगीरीवर विहीत केलेला गणवेष परिधान करणे आवश्यक राहील अशा अटीचा उल्लेख केलेला नाही.
3) निविदा जाहिरात मध्ये वाहन चालकाची किमान शैक्षणिक अर्हता नमुद करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.
4) मोटार वाहन अधिनियम 1988 नियम 4 (2) (3) प्रमाणे वाहन चालकांच्या वयोमर्यादा बाबत करारपत्रात उल्लेख केलेला नाही.

5) अग्नीशमन विभागात काम करणारे वाहन चालक हायड्रोलीक शिडीचा वापर करणे व हॉर्स पाईप चालविणे इत्यादी कामे हाताळण्यास सक्षम असणे आवश्यक असल्या बाबतची अट निविदा मध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आसताना अशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

6) व्यवसाय कर महाराष्ट्र राज्य कर नियम 1975 मधील अधिनियम 27 (a) अन्वये प्रतिमाह वेतनातुन रु.200/- व माहे फेब्रुवारी महिन्याचे वेतन अदा माहे मार्च मध्ये रु.300/- (आर्थिक वर्षानिहाय रु.2500/- प्रति कर्मचारी) मधुन वजाती करुन मक्तेदारांनी व्यवसाय कर भरणा करणे बाबतची अट करारपत्रात नमुद केलेली नाही. तसेच सदर व्यवसाय कर रक्कम ठेकेदारानी भरणा केली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी. अन्यथा (121 x 2,500 = 3,02,500/-) व्यवसाय कर रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करुन व्यवसाय कर लेखाशिर्षाखाली भरणा करुन शासनाचे होणारे आर्थिक नुकसान टाळावे.

7) ठेकेदार वाहन चालक पुरवठा करणे अंतर्गत शासन नोंदणीकृत असल्या बाबतचे कागदपत्रे नस्तीत उपलब्ध झालेले नसल्याने याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

8) ठेकेदार मे. सिक्युअर, सिक्युरीटी सर्व्हिस या नावाने ठेका दिलेला आहे. त्यानुसार सदर ठेकेदार सिक्युरीटी सर्व्हिस प्रोव्हाईडेड असताना नियमबाहय रित्या त्यांना वाहन चालक पुरवठा ठेका मंजुर केलेला असल्याचे दिसुन येत आहे.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.19.2:- मुद्रांक शुल्क कमी भरणा केल्याने झालेल्या अनियमितता बाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिकेत ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे बाबत कार्यादेश क्र. मनपा/वाहन/249/2021-22 दि.30/12/2021 नुसार मक्तेदार मे. सिक्युअर सिक्युरीटी सर्व्हिस भुमीराज बुल्डर्स हयांना देण्यात आलेला आहे. सदर मक्तेदाराकडुन दिनांक 16/12/2021 रोजी करारनामा करण्यात आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

मिरा भाईंदर महानगरपालिका वाहन विभागाकडुन 121 वाहन चालक पुरवठा करणे कामी प्रति वाहन चालक वेतन रक्कम रु.2,39,631/- प्रमाणे कार्यादेश दिलेला आहे. त्यानुसार ठेक्यांचे एकुण मुल्यांकन 121 x 23963 x 12 महिने = 3,47,94,276/- इतके होते. त्यानुसार शासन निर्णय अन्वये करारनामा रक्कम रु.34,300/- इतक्या रक्कमेच्या मुद्रांक शुल्कावर करणे आवश्यक आहे. (पहिल्या 10 लाख रक्कमेसाठी रु.500/- व नंतरच्या प्रति लाख रक्कमेस रु.100/- प्रमाणे) तथापि करारनामा 19,000/- इतक्या मुल्यांच्या मुद्रांक शुल्कावर केलेला आहे. त्यामुळे 15,300/- इतक्या कमी रक्कमेचा मुद्रांकाचा वापर केल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तरी संबंधित ठेकेदाराकडुन रक्कम रु.15,300/- वसुल करुन शासन खाती मुद्रांक शुल्क लेखाशिर्षाखाली भरणा करुन लेखापरीक्षणास अनुपालनासह पुर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.19.3:- आवश्यकता पेक्षा अधिक वाहन चालक मागणी केल्याने आर्थिक नुकसानी बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत वाहन विभागाचे कार्यादेश क्र. मनपा/वाहन/249/2021-22 दि.30/12/2021 दि.30/12/2021 अन्वये मक्तेदार मे. सिक्युअर सिक्युरीटी सर्व्हिस भुमीराज बुल्डर्स ह्यांना दि.01/01/2022 ते 31/12/2022 या कालावधी करीता 121 वाहन चालक प्रति वाहन चालक प्रति माहे रक्कम रु.23,963/- प्रमाणे पुरवठा करणे कामी आदेशित केलेले आहे.

विभागाच्या टिपण्णी नुसार 137 वाहन चालक आवश्यकता असल्याचे नमुद केलेले आहे. त्यापैकी 39 वाहन चालक महानगरपालिकाकडे कार्यरत असल्याने निव्वळ 98 वाहन चालक आवश्यक आहेत. 14 वाहन चालक साप्ताहिक बदली नुसार एकदरित (98+14) 112 वाहन चालक आवश्यक असताना 121 वाहन चालक मागणी केल्याने 9 वाहन चालक जादा मागणी केल्याने 9 X 23963 प्रतिमाह प्रमाणे एका वर्षाकरीता रु.2,58,80,041/- इतकी जादा रक्कम खर्च झालेली असल्याने पर्यायाने रु.2,58,80,041/- इतक्या रक्कमेचे महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येत आहे.

तरी याबाबत लेखापरीक्षणास अनुपालनासह पुर्तता दर्शवावी.

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग

परिच्छेद क्र. 20.1:- सामान्य पावतीद्वारे जमा होणारी रक्कम पोटकिर्द मध्ये कमी जमा/ न जमा दर्शविल्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2020-2021 व 2021-2022 च्या लेखापरीक्षणात उद्यान व वृक्ष प्राधिकारण विभाग प्रभाग क्र.01,02 व 03 कडिल सामान्य पावती द्वारे संकलीत रकमेची पडताळणी केली असता पावती द्वारे संकलन रकमेपेक्षा कमी अथवा संकलन केलेल्या रकमेची नोंद पोटकिर्द मध्ये नोंदविण्यात आलेली नसल्याचे निर्देशनास येते.

याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	पावती पुस्तक क्र.	पावती क्र.	दिनांक	पावतीप्रमाणे संकलीत रक्कम	पोटकिर्द जमा रक्कम	पोटकिर्द मध्ये कमी जमा रक्कम / न जमा रक्कम
01	12	1110	26/04/2021	200/-	100/-	100/-
02	12	1119	24/05/2021	200/-	निरंक	200/-
03	12	1120	24/05/2021	100/-	निरंक	100/-
			एकुण	**500/-**	**100/-**	**400/-**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2013 मधील नियम 55 व 78 नुसार पावतीद्वारे सकंलन केलेली रक्कमेची तंतोतत नोंद पोटकिर्द मध्ये नोंदवून त्या बाबतचे चलन तयार करुन लेखा शाखेत कॅशबुक नोंदी करीता दिले जाते पोटकिर्द मध्ये कमी जमा रक्कम नोंदविल्याने अथवा न नोंदविल्याने पर्यायाने कॅशबूकात सदर रकमेची नोंद न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तरी संबंधीता कडून कमी जमा/ न जमा रक्कम रु.400/- वसुल करुन लेखा शाखेत जमा करुन लेखापरीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रु.400/-

परिच्छेद क्र.20.2:- पर्यावरणाचा समतोल राखणारी झाडे लावण्याबाबत...

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकडील सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात मा. आयुक्त यांचे आदेश जा.क्र.मनपा/ आयुक्त/58/2018-19 दि.15/09/2018 नुसार उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाने, नगररचना विभागामार्फत विकासक / भुखंड मालक यांना बांधकाम प्रारंभपत्र दिल्यानंतर विकासामुळे बाधित होणारी झाडे यांची पाहणी करुन परवानगी देणेची आहे. तसेच इमारतीस भोगवटा दाखला देण्यापुर्वी उक्त आदेशात नमुद केलेली व मंजुर विकास नियंत्रण नियमावली नुसार

एकुण अनुज्ञेय आर.जी जागेमध्ये प्रति चौ.मी क्षेत्राकरीता 5 झाडे व आदेशीत परि.3 नुसार विकासकाने शहरात जास्तीची हिरवळ व हरितपट्टा निर्माण करण्याचे दृष्टीने विकसित भुखंडाच्या क्षेत्रफळानुसार प्रति 100 चौ.मी 2 जास्तीची झाडे/वृक्ष लावने अनिवार्य आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वृक्ष लागवड झाडांना जिओ टॅगींग करुन वृक्ष नोंदवही ठेवणे आवश्यक आहे तरी लेखापरीक्षणास अनुपालनसह पुर्तता दर्शवावी.

2) वृक्ष लागवडीपैकी मृत वृक्षाच्या जागेवर नविन वृक्ष लागवड केल्याबाबतची नोंदवहीतील नोंदी लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.20.3:- उद्दयान व वृक्षप्राधिकरण विभागाकडील प्रभाग 1,2 व 3 चे दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध न करून दिल्याबाबत.

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकडील प्रभाग 1,2 व 3 चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरिक्षणात सन 2021-22 चे सामान्य पावती पुस्तके, पोटर्किद,चलने लेखापरीक्षणास सादर करण्यात आली असून सन 2020-21 चे सदर दप्तर उपलब्ध करून न दिल्याने झाडे तोडण्यासाठी पहाणी करून परवानगी देणे कामी फी आकारणी करणे, अनामत स्वीकारणे इत्यादीची पडताळणी करता आली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.20.4:- शहरी भागात वृक्षलागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -2016/प्र.क्र.60/नवि-34 मंत्रालय 32 दि.01 मार्च 2018 अन्वये राज्यातील वनक्षेत्र 20% वरुन 33% पर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्र उपक्रम अंतर्गत वृक्ष लागवड/ रोपांची उपलब्धता /सुक्ष्म आराखडा/ रोपे वाटप/वृक्षलागवड नोंद/वृक्ष संवर्गात आढावानुसार 3 वर्षात 50 कोटी वृक्षरोपणाचे उद्दिष्ट निश्चिती केलेली आहे. त्यानुसार सन 2020-21 ते 2021-22 करिता वृक्षरोपणाचे उद्दिष्ट नुसार महानगरपालिका अंतर्गत प्रतिवार्ड किमान उद्दिष्ट साध्यांक जीओ टॅगींग व वृक्ष लागवड नोंदवही तसेच 80-90% वृक्ष/रोपे जिवंत राहण्यासाठी केलेली उपाययोजना संबंधिचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याचे ह्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र. 20.5:- विकासकाकडील वृक्षप्राधिकरण अनामत रक्कम जप्त करणेबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील हरीत क्षेत्रात वाढ करण्याच्या अनुषंगाने नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील परिपत्रक क्र.राहव/10004/प्र.क्र./37/नवि-20, दि.24/11/2005 नुसार मा. आयुक्त, मिभामनपा यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आयुक्त/58/2018-19 दि.15/09/2018 मधील मुद्दा क्र.7 नुसार विकासकाने लागवड केलेल्या झाडांचे योग्यरितीने संगोपन न केल्यास प्रती वृक्ष रु.5000/- अनामत शुल्क जप्त करणे आदेशित केलेले आहे.

त्यानुसार वित्तीय वर्ष 2020-21 ते 2021-22 हया कालावधीत किती अनामत रक्कम विकासकाकडून जप्त करुन महानगरपालिका फंडात जमा करण्यात आलेली आहे. हयाबाबतची माहिती लेखा परिक्षणात अर्धसमास पत्रानुसार मागविण्यात आलेली होती. तथापि सदर माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

तरी याबाबत वर्षनिहाय अनामत जप्त रक्कमेचा गोषवारा (तेरीज पत्रक) लेखापरिक्षणास अनुपालनासह पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.20.6:- विकासकांनी अपेक्षित वृक्ष लागवड न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत..

मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.राहव/1004/प्र.क्र.137/नवि-20, दि.24/11/2005 नुसार मा. आयुक्त मिभामनपा यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आयुक्त/58/2018-19 दि.15/09/2018 मधील मुद्दा क्र.8 नुसार विकासकाकडून अपेक्षित वृक्ष लागवड न केल्यास प्रती वृक्ष रु.7000/- याप्रमाणे किती रक्कम संकलन करण्यात आली व त्यानिधीमधुन उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत शहरात हरीत पट्टा व वृक्षलागवडीचे काम घेण्यात आले किंवा कसे? याबाबत लेखापरिक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

समाजविकास विभाग

परिच्छेद क्र. 21.1:- पथविक्रेता उपजीविकेचे संरक्षण पथ विक्री विनिमय महाराष्ट्र योजना 2017 दप्रमाणे कार्यवाही बाबत...

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय नगर विकास विभाग शा. नी. क्र. बी.एम.सी-2516/ प्र.क्र.1519/2016/ नवि-21 दि.09 जाने 2017 नुसार पथविक्रेता (उपजिविका, संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम 2014 नुसार सर्व पथविक्रात्याचे सर्वेक्षण करुन त्यांना विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र देणे, विक्री प्रमाणपत्र नुतनीकरण करणे, पथविक्रीत्यांना जागा देणे व त्यांचे निष्कासन करणे. विक्री प्रक्षेत्र निर्धारीत करणे, नगर पथविक्रेता समिती स्थापन करणे व पायाभुत सुविधा सुधारणा प्रशिक्षण कौशल्य विकास व आर्थिक सहाय्य इ. बाबींचा समाविष्ठ आहे. याबाबत वित्त वर्ष 2020/21 व 2021-22 हया कालावधीच्या लेखापरीक्षणा करीता लेखापरीक्षा विभागाचे अर्धसमास पत्र क्र.3 दि.16/06/2023 नुसार पथविक्रेता उपजिविकेचे संरक्षण पथ विक्री विनियम प्रमाणे नमुद शासन निर्णय अन्वये केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत सुचित करण्यात आले होते. तथापि सदर विभागाने लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करुज्न दिलेले नाहीत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 (2) नुसार लेखापरीक्षणाकरीता मागणी केलेले अभिलेख तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि हयाबाबत अर्धसमास पत्र क्र.1 दि.29/05/2023 व्दारे मागणी करुनही समाजविकास विभागाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षणास अभिलेख्यांची पडताळणी करता आलेली नाही.
2) महराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील नियम 468 अन्वये लेखापरीक्षणास आवश्यक असलेले दस्तावेज / अभिलेख तपासणी करता उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.21.2:- समाजविकास विभागाचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत समाज विकास विभागाचे समाज विकास अंध व अपंग व क्रिडा विभगाचे वित्त वर्षा 2020-21 ते 2021-22 हया कालावधीचे अभिलेख लेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षण विभागाचे अर्धसमास पत्र क्र.1 दि.29-05-2023 व्दारे मागणी करण्यात आलेली आहे. सदर अर्धसमास पत्रान्वये खालील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देणेबाबत सुचित करण्यात आलेले होते. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

1) शासकीय प्राप्त अनुदान (योजना निहाय)
2) मनपा प्राप्त अनुदान (योजना निहाय)
3) योजना प्रस्ताव व प्राप्त मंजुरी आदेश
4) योजना निहाय उपयोगिता प्रमाणपत्रे
5) अखर्चित शासन अनुदान
6) शिल्लक अनुदान शासन भरणा बाबतचे चलन
7) रोख वही (cash book)
8) पोटकिर्द
9) पावती पुस्तके
10)साहित्य साठा नोंदवही
11)इतर अनुषंगिक लेखे
12) अंध व अपंग योजना अभिलेख
13)क्रिडा योजना अभिलेख

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 (2) नुसार लेखापरीक्षणाकरीता मागणी केलेले अभिलेख तत्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि ह्याबाबत अर्धसमास पत्र क्र.1 दि.29/05/2023 व्दारे मागणी करुनही समाजविकास विभागाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षणास अभिलेख्यांची पडताळणी करता आलेली नाही.
2) महराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील नियम 468 अन्वये लेखापरीक्षणास आवश्यक असलेले दस्तावेज / अभिलेख तपासणी करता उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

स्थानिक संस्था कर विभाग

परिच्छेद क्र.22.1:- मुद्रांक शुल्क अनुदाना बाबत..

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (1949 चा 59) कलम 149 अ नुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (1958 चा 60) या अन्वये स्थावर मालमत्ता विक्री /देणगी व गहाण या बाबत संलेखांवर अशा रिक्त असलेल्या मालमत्तेच्या मुल्यावर आणि गहाण संबंधीच्या बाबतीत संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर 1% मुद्रांक शुल्क अधिभार आकारण्यात येतो.

महानगरपालिका 5 क्षेत्रात अशा खरेदी विक्री मालमत्ता वरील अधिभार पोटी होणारी मुद्रांक शुल्क रकमेपैकी महागनरपालिकेच्या हिस्सा रक्कम नुसार संवितरण तथा नियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्याचे कोषागारातून आहरण करुन महानगरपालिकेस वित्त वर्ष 2020-21 व 2021-22 हया कालावधी करीता मुद्रांक शुल्क व जमित महसुल अनुदान अनुज्ञेय असलेली रक्कम, वितरीत केलेली रक्कम व येणे बाकी असलेल्या रक्कमेबाबत अर्धसमास पत्र क्र.01 दिनांक 01/09/2023 नुसार लेखा विभागास माहिती अवगत करणे बाबत सुचित करुनही माहिती अवगत झालेली नाही. त्यामुळे येणे रक्कम प्राप्त रक्कम व थकबाकी हया बाबत लेखापरीक्षणास मेळ घेता आलेला नाही.

तरी याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावे.

परिच्छेद क्र.22.2:- थकित स्थानिक संस्था कर रक्कम वसुलीबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत स्थानिक संस्था कर विभागाच्या विवरणपत्रानुसार खालील नमुद विवरणपत्रानुसार स्थानिक संस्था कर रक्कम थकबाकी दिसुन येत आहे.

स्थानिक संस्था कर महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्रमांक अन्वये दिनांक पासुन बंद होवुन त्या एवजी वस्तु सेवाकर अधिनियम 2017 कलम 51 अन्वये कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. तथापि वित्त वर्ष 2021-22 अखेर वित्त वर्ष 2010-11 ते 2016-17 पर्यंत कालावधीची व्यापारी संस्थानिहाय स्थानिक संस्था कराची थकीत रक्कम खालील प्रमाणे दिसुन येत आहे. सदरची विवरणपत्रके स्थानिक संस्था कर विभागाने प्रमाणित केलेली आहे.

रजिस्टर कालावधी	एकुण व्यापारी संख्या	एकुण LBT मागणी रक्कम (मुळ मागणी + व्याज+ दंड)	न्याय प्रविष्ठ घर रक्कम	न्याय प्रविष्ठ थकीत रक्कम	वसुली रक्कम	थकित रक्कम
एप्रिल 21 ते मार्च 22	319	89976340	15721167	15368887 + 4303735	42696179	11886372
22-01-19 ते 31-03-22	42	28218376	13596286	2771837	9327621	2522632

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त वर्ष 2010-11 ते 2016-17 ह्या कालावधीपर्यंतचे थकीत स्थानिक संस्था कर वित्त वर्ष 2021-22 अखेर मोठ्या प्रमाणात थकीत दिसुन येत आहे. तरी सदरील थकबाकी वसुली करुन लेखापरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावी.
2) थकबाकी बाबतचे एकुण व्यापारी संस्था व थकबाकी रक्कम ह्यांची नोंदवहीत नोंद करुन थकबाकी / वसुली बाबतचे विवरणपत्रक लेखा परीक्षणास दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम:- 1,44,09,004/-

परिच्छेद क्र.22.3:-न्याय प्रविष्ठ दाव्यात स्थानिक संस्था कर रक्कम गुंतलेली असल्याबाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत स्थानिक संस्था कर विभागाचे वित्त वर्षा 2020-21 ते 2021-22 ह्या कालावधीचे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कर विभागाचे अभिलेख तपासणी केली असता वित्त वर्ष 2010-11 ते 2016-17 अखेर पर्यंत व्यापारी संस्था निहाय कराची रक्कम न्याय प्रविष्ठ दाव्यात गुंतलेली दिसुन येत आहे. ह्याबाबत खालीलप्रमाणे विवरणपत्रात गुंतलेली रक्कम अभिलेख्यावरुन निर्देशनास येते.

वर्ष	प्रलंबित दाव्यात गुंतलेली रक्कम	मा. उच्च न्यायालय/ जिल्हा न्यालाययामधील प्रलंबित दाव्यातील गुंतलेली रक्कम	एकुण दाव्यापोटी गुंतलेली रक्कम
1-04-21 ते 31-03-22	43,03,735	15368887	19672622

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) न्याय प्रविष्ठ दाव्यात स्थानिक संस्था कर गुंतलेली रक्कम याबाबत विभागाने विधी विभागामार्फत दाव्याच्या निकाला अंती वसुली करुन लेखा परीक्षणास अनुपालन दर्शवावे.
2) एकुण दाव्यात गुंतलेली रक्कम किती दाव्यापोटी आहे ह्याबाबतचे तपशिलवार माहिती (उदा.दावे क्रमांक/ गुंतलेली रक्कम) नोंदवहीत प्रमाणित करुन लेखापरीक्षणास अवगत करावी.

महिला व बालकल्याण विभाग

परिच्छेद क्र.23.1:- आरोग्य शिबिर मधील अनियमितताबाबत..

1. **योजनेचे नाव :-** गलिच्छ वस्ती झोपड्यामध्ये आरोग्य शिबीर कार्यक्रम
2. **निधीचा प्रकार :-** /महानगरपालिका निधी
3. **तरतूद / वर्ष :-** 2021-2022 रु.5,00,000/-
4. **तरतूद वर्षातील खर्च रक्कम :-** 2,09,880/-
5. **योजनेचे लाभधारक संख्या :-** नमूद नाही.
6. **योजनेच्या लाभधारकाचे निकष :-** नमूद केलेले नाहीत.
7. **प्रशासकिय आदेश (ठराव)** I. मा. आयुक्त, ठराव क्र.3 दि.06/08/2021
   II. मा. स्थायी समिती
   III. मा. महासभा
8. **तांत्रिक मंजूरी :-** प्रस्ताव क्र.2333 दि.15/06/2021
9. **लाभधारकांची महिला बालकल्याण समितीची मंजूर यादी :-** नस्ती सोबत जोडलेली नाही.
10. **मंजूर निविदाधारकाचे नाव :-**
    1) मे. प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक मिहला संस्था - श्रीमती. मिरा खोते.
    2) मे. संकल्प सेवाभावी संस्था - श्रीमती. सुनिता ठाकूर.
11. **करारनामा :-** करारनामा केला आहे. परंतू त्यावरती दिनांक नमूद नाही.
12. **कार्यादेश :-** जा.क्र.मनपा/मबाक/180/2021-2022 दि.26/11/2021
13. **माल पुरवठा चलनाची सविस्तर माहिती व साठा नोंदवहीचा तपशिल :-** नस्ती सोबत उपलब्ध नाही.
14. **मालाची तांत्रिक तपासणी अहवाल :-** नस्ती सोबत उपलब्ध नाही.
15. **लाभधारकांचा वस्तूचे वाटप नोंदवही :-**
16. **उपयोगिता प्रमाणपत्र :- दिलेले नाही.**

महिला बालकल्याण अधिकारी व मे प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था मिरा-गांव यांच्या वतीने श्रीमती मिरा खोसे यांच्यामध्ये अटी शर्तीच्या अधिन राहून महिला व बालकांसाठी रोगनिदान व उपचार शिबीर आयोजित करुन सदर ठिकाणी विविध साहित्य पुरवठा करणेबाबतचा करारनामा करण्यात आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे आभिप्राय आहेत :-

1) करारनाम्यावर करार केल्याचा दिनांक नमूद करण्यात आलेला नाही. तसेच सदरची योजना ही सन 2021-22 या आर्थिक वर्षामध्ये राबण्यिात आली असताना करारनामा मध्ये मुद्रांक शुल्क (स्टॅम्प) क्र.CB642243 हा जिल्हा कोषागार कार्यालय ठाणे यांचे

कडून 06/09/2023 रोजी वितरीत करण्यात आला असून करारनामा करण्यासाठी मुद्रांक (स्टॅम्प) क्र. CB 642243 दि.08/09/2023 रोजी खरेदी करण्यात आला आहे. म्हणजेच सदर योजनेवर खर्च करुन झाल्यानंतर करारनामा करण्यात आलेला आहे असे निदर्शनास येते. वास्ताविकपणे कार्यादेश पूर्वी करारनामा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही विभागामार्फत केलेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर योजनेवर झालेला खर्च रक्कम रु.209880/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) सदर योजनेसाठी मे. संकल्प सेवाभावी संस्था यांच्या वतीने श्रीमती. सुनिता ठाकूर यांचे बरोबर महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत एकुण 35 झोपडपट्टीमध्ये बेटी बचाव योजना अंतर्गत करारनामा केलेल्या करारनाम्यावर दिनांक नमूद नाही. सदर करारनामा करताना जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे यांचे कडून दि.03/08/2023 रोजी वितरीत करण्यात आलेल्या व दि.05/09/2023 रोजी मुद्रांक क्र. CA 408546 व CA 408547 (स्टॅम्प) खरेदी करण्यात आलेला आहे. म्हणजेच योजना प्रथम राबवून नंतर करारनामा करण्यात आल्याचे निदर्शनास येते. तेव्हा सदरचा करारनामा नियमानुसार व कायद्यानुसार योग्य असलेबाबती पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

3) सदर आरोग्य शिबीरामध्ये किती लाभार्थ्यांना लाभ मिळाला याबाबत लाभार्थी संख्या नमूद करण्यात आलेली नसल्याने शिबीराचा महिला व बालकांना हया योजने अंतर्गत लाभधारकांना उचित लाभ दिल्याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

4) सदर आरोग्य शिबीरात बालक/महिला लाभधारकांपैकी रोग-निदानात गंभीर स्वरुपातील रोगनिदान झालेल्या रुग्णावर कोणती कोणती उपाय योजना केली याबाबतचे कागदपत्र नस्ती सोबत दिसून येत नाहीत. त्यामुळे योजनेची उदिष्ट परिपुर्तता सफल झाली असे म्हणता येणार नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.23.2:- हॉस्पीटल मध्ये प्रसुती महिलांकरीता पाळणासह पलंग पुरवठा योजनेमधील अनियमितता बाबत.

1) **योजना :-** हॉस्पीटल मध्ये प्रसुती महिलांकरीता पाळणासह पलंग पुरवठा करणे.
2) **निधीचा प्रकार :-** महानगरपालिका निधी
3) **खर्च रक्कम :-** 4,40,000/-
4) **तरतूद :-** 5 लाख
5) **लेखाशिर्ष :-** मा. कौटूंबिक न्यायालयातील पिडीत व त्यांचे छोटे मुले यांच्या साठी स्वच्छता/ विश्रामगृहाची व्यवस्था.
6) **तांत्रिक मंजूरी :-** 5 लाख
7) **मंजूर निवीदा धारकांचे नाव :-** मे. आरती इंटरप्रायजेस (नितेश जयवंत पाटील)
8) **करारनामा :-** 11/2/2022
9) **कार्योदेश :-** मनपा/मबाक/229/21-22 दि.11/02/2022
10) **मालपुरवठा :-** चलन क्र.001 दि.15/02/2022 नग- 22
11) **मालाची तांत्रिक तपासणी अहवाल :-** नाही.
12) **जड संग्रह नोंदवहीतील नोंद :-** उपलब्ध झालेले नाही.

Specification

Bank Raising with one manual crank on bearing without railings without castrurs epoxy coated cradder safe working load 150kg overall bef
Length 216 cm
Width 90 cm
Height 56 cm
Matters size required 195 cm = 89 cms
महिला बालकल्याण साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र.38 वर नोंद (चलन नुसार आहे)

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) लेखाशिर्ष - मा. कौटूबिंक न्यायालयातील पिडीत महिला व त्यांचे छोटे मुले यांच्या साठी स्वच्छता / विश्रामगृहाची व्यवस्था अशी असताना नियम बाहयपणे हॉस्पीटल मध्ये प्रसुती महिलांकरीता पाळणासह पलंग पुरवठा हया कामी सदर खर्च कलेला असल्याने योजनेचे मूळ उदिष्ठ साध्य झालेले नाही.
2) निविदा / कार्योदेश मध्ये नमूद केलेले पाळणासह पलंगाचे मोजमापे व तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) Working Load क्षमता - 150kg
ब) पलंगाची लांबी - 216 cm
क) पलंगाची रुंदी - 90cm

ड) पलंगाची उंची - 56cm

इ) पलंगाची मेट्रस size - 195 X 89cms

माल पुरवठा केल्याबाबतची खात्री करता आलेली नाही.

3) सदर 22 नग (पाळणा सह पलंग) स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात प्राप्त झाल्या बाबतचे वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र नस्तीत उपलब्ध झालेले नाही. तसेच जड संग्रह नोंदवहीतील नोंद लेखापरीक्षणास तपासणीस उपलब्ध झालेले नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.23.3:- घरघंटी वाटप योजनेतील अनियमितता बाबत.

1) **योजना :-** घरघंटी मशिन वाटप योजना (साहित्य वाटप योजना)
2) **वर्ष :-** 2021-2022
3) **निधीचा प्रकार :-** महानगरपालिका निधी
4) **ठराव :-** मा. स्थायी समिती ठराव क्र.91 दि.07/12/2021
   मा. आयुक्त ह्यांची मंजूरी दि.20/11/2022
5) **कार्योदेश :-** मनपा/मबाक/208/21-22 दि.05/01/2022
6) **करारनामा :-** दि.20/12/2021
7) **मक्तेदार :-** मे. जय खांडियार मेन्युफैक्चर
8) **लेखाशिर्ष :-** गरीब व गरजू महिलांना साहित्य वाटप
9) **तरतूद :-** 15 लाख
10) **खर्च रक्कम :-** अ) इनवाईज क्र.GT/172
    दि.17/01/2022 नुसार 1041600/-
    (62 नग GST 5% सह)
    ब) इनवाईज क्र. GT/163
    दि.06/01/2022 रु.1176000/- (GST 5% सह 70 नग)

एकुण खर्च रक्कम रु.2217600/- (132 नग @ 16800/- रु.)

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

1) योजनेचे लाभधारक निवड निकष नमूद केलेले नाहीत.
2) घरघंटी पुरवठा बाबतचे चलन नस्ती सोबत जोडलेले नाहीत.
3) घरघंटी पुरवठा झाल्यानंतर नमूद स्पेसिफिकेशन नुसार तांत्रिक दर्जासाठा शासनाचे प्राधिकृत केलेल्या तांत्रिक संस्थेकडील प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.
4) वाटप यादी नस्ती सोबत जोडलेली नाही.
5) मंजूर लाभधारक यादी नस्ती सोबत जोडलेली नाही.

6) उपयोगिता प्रमाणपत्र लाभधारकांकडून घेण्यात आलेले नाहीत.
7) घरघंटी वाटप योजनाअंतर्गत तरतूद 15 लाख असताना खर्च रक्कम रु.2217600/- केलेला आहे. तरतूदी पेक्षा 717600/- रक्कम जादा खर्च केलेला आहे. त्या बाबतचे सुधारित मंजूर तरतूद अथवा तरतूदीपेक्षा अधिक खर्चास मा. स्थायी समिती/ मा.आयुक्त सो. यांची मंजूरी घेण्यात आलेली दिसून येत नाही. तसेच ह्याबाबत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल नाहीत.

परिच्छेद क्र.23.4:- महिला बालकलयान विभागाच्या योजनानिहाय व लेखा शिर्षानिहाय तरतुद व खर्चाबाबत..

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनानिहाय व लेखाशिर्षानिहाय वित्त वर्ष 2020-21 व 2021-22 मधील तरतुद व प्रत्यक्ष खर्चाचेविवरण खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	वित्त वर्ष	एकुण तरतुद रक्कम	एकुण खर्च	कमी खर्च रक्कम
01	2020-21	300 लाख	160.17 लाख	256.11 लख
02	2021-22	523 लाख	452.78 लाख	70.22 लाख

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) नगरविकास विभागाचे परिपत्रक क्र.जी.क्र.एन 1093/1198/ नवि-14 मंत्रालय दि. 1 जुलै 1994 नुसार महिल व बालकल्याण योजना राबविण्याकरीता महानगरपालिका / नगरपालिकांनी आपल्या वार्षिक महसुली उप्तन्नातुन बांधिल खर्च वजा जाता उर्वरीत रक्कमेच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या 5 टक्के रक्कम निर्धारीत करुन स्वतंत्र तरतुद दर्शवुन योजना राबविणेबाबत आदेश दिलेले आहेत. तसेच नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण 2005/प्र.क्र.255/05/ नवि20 मंत्रालय दि.08/11/2010 च्या शासन निर्णयान्वये महिला व बालकल्याण यासाठी राखीत असलेल्या 5% तरतुदीतुन योजनानिहाय खर्च करणेबाबत नमुद केलेले आहे. तथापि वित्तवर्ष 2020-21 व 2021-22 हया कालावधीमधील तरतुदीपेक्षा कमी खर्च केलेला दिसुन येत आहे. ह्याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.23.5:- महिला बालकल्याण विभागातील नियम बाह्य खर्चाबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाचे वित्त वर्ष 2020-21 व 2021-22 ह्या कालावधीचे लेखापरीक्षणात वार्षिक जमा/खर्च विवरणपत्राची पडताळणी केली असता वित्त वर्ष 2021-22 ह्या कालावधीत पुरुषांना कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत ह्या लेखा शिर्षाखाली 13 लाख रु. रक्कम अर्थ संकलीत तरतूद करण्यात आलेली असून आर्थिक वर्षा अखेर सदर लेखा शिर्षाखाली 12 लाख रुपये रक्कम खर्च केलेली आहे.

ह्या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) शासन निर्णय महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग क्रमांक जी.ई एन - 1093/325/प्र.क्र.24/नवि-14 दिनांक 01/04/1993 नुसार मुद्दा क्र.04 अन्वये योजनेचे लाभधारक म्हणून प्रक्षेत्रातील बालक व महिलांचा लाभ देण्यात उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 2005/प्र.क्र.255/05/नवि/20/मंत्रालय दि.08 नोव्हेंबर 2010 नुसार महिला व बालकल्याण या साठी राखीव असलेल्या 5% तरतूदीतून खर्च करावयाच्याबाबत योजनेचा मार्गदर्शन तत्वात नमूद केलेला आहं.

   वरील दोन्ही शासन निर्णयाप्रमाणे महिला व बालकल्याण विभागाने वित्त वर्ष 2021-22 मध्ये पुरुषांना कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदती करिता रक्कम रु.12 लाख रुपये नियम बाह्य रित्या खर्च केलेला असल्याचे निर्देशनास येते. तरी नियम बाह्य खर्चा बाबत लेखापरीक्षणास अनुपालनासह पूर्तता दर्शवावी.

माहिती व तंत्रज्ञान विभाग (संगणक)

परिच्छेद क्र.24.1:- खरेदीच्या नोंदी तपशिलावर नोंदविणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संगणक विभागाचे लेखापरिक्षण सन 2021-1 व 2021-22 चे केले असता नमुना नंबर 114 मध्ये (जंगम मालमता नोंदवही) खरेदी बाबत सविस्तर तपशिल लिहिणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. उदा. बिल नंबर, कार्यादेश, मॅन्युफॅक्चर दिनांक, चलन क्रमांक, साठा रजिस्टरला घेतलेली नोंद मालाचे वर्णन (मेक)इत्यादी तपशिल सविस्तर लिहिणे आवयश्क आहे.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.24.2:- लॅपटॉप वाटप पोहोच न घेतल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संगणक विभागाचे सन 2020-21 व 2021-22 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केले असता विभागाने 4 नग लॅपटॉप जेम पोर्टलव्दारे चलन क्र. 01211/जाने/19-20 प्रति नग रु. 49500/- (जेम C-511687777724229) खरेदी केले आहेत. (जडसंग्रह नोंदवही पान क्र. 50) सदर लॅपटॉपचे खालीलप्रमाणे वितरण करण्यात आले आहे.

अ. क्र.	विभागाचे नाव	दिनांक	घेणाऱ्याचे नाव
1.	लेखापरिक्षण विभाग	27-01-2020	नरेश हरी निजई
2.	लेखापरिक्षण विभाग		
3.	संगणक विभाग	-	स्वाक्षरी नाही
4.	लेखा विभाग	-	नील डिसोना

ज्या विभागांना लॅपटॉप वितरीत करण्यात आले आहेत त्यांच्या पोहोच लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत तसेच संगणक विभागाची लॅपटॉप घेण्याऱ्याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. सदर बाबतची पुर्तता करुन अनुपालन लेखापरिक्षणात सादर करण्यात यावे.

2. वैद्यकीय विभागासाठी 20 नग लॅपटॉप खरेदी पोर्टलव्दारे चलन क्र. 01209/ जाने/19-20 प्रती नग रु. 49500/- प्रमाणे खरेदी केले आहेत सदरचे लॅपटॉप वितरणाच्या पोहोच लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र. 24.3 :- साहित्य पुरवठा चलन लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नसल्याबाबत..

मे. एस.वे. कॉम्प्युटर्स यांचेकडुन दि. 27/11/2020 रोजीचा कार्यादेश क्र. मनपा/संगणक/251/2020-21 चलन क्र. 20/18-13 व चलन क्र. 21/01-16 मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, सर्व प्रभाग कार्यालय विभागीय कार्यालय, दवाखाने, लोकल एरिया नेटवर्कने जोडणेकरीता खालील साहित्यांचा पुरवठा केला आहे.

1. इंदिरा गांधी हॉस्पीटल येथे खालील साहित्य पुरवठा

1	4u rack	1 नग
2	1/0	8 नग
3	1/0 Face Plate	8 नग
4	1/0 Box	8 नग
5	24 Port Patch Panel	1 नग
6	P.V.C Pipe / patti (3/4 ways splitter Flexiblepipe	75 नग
7	4 Box Cat 6 (305 Meter)	4 नग
8	24 port Margable Swilch	9 नग
9	Patch code	16 नग

पुरवठा दिनांक 28/12/2020

2. प्रभाग कार्यालय क्र. 5 खालील साहित्य पुरवठा कार्यादेश क्र. मनपा/संगणक /251/2020-21 चलन क्र. 20/18-12-व 20/01/2015

1	4u rack	2 नग
2	1/0	50 नग
3	1/0 Face Plate	50 नग
4	1/0 Box	50 नग
5	24 Port Patch Panel	2 नग
6	P.V.C Pipe / patti (3/4 ways splitter Flexiblepipe	400 नग
7	4 Box Cat 6 (305 Meter)	4 नग
8	Patch Code	80 नग

प्रभाग कार्यालय क्र.4 येथे खालील साहित्य पुरवठा विलासराव देशमुख कार्यादेश क्र. मनपा/संगणक /251/2020-21 चलन क्र. 21/02-16-व 20/018/-14

1	Patch Code	100 नग
2	4u rack	3 नग
3	1/0	50 नग
4	1/0 Face Plate	50 नग

5	1/0 Box	03 नग
6	24 Port Patch Panel	400नग
7	P.V.C Pipe / patti (3/4 ways splitter Flexiblepipe	50 नग
8	24 Post Managble	3 नग

उपरोक्त साहित्याचा पूरवठा एस वे कॉफप्युटर्स यांचेकडुन पुरवठा करण्यात आला आहे. त्याबाबतचे चलन तपासणी करिता व साहित्य मिळाले बाबतचा पोहोच लेखापरिक्षणास पडताळणी करिता प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.24.4:- पावती पुस्तक उपलब्ध नसलेबाबत

संगणक विभागाचे लेखे तपासले असता खालील पावती क्रमांकाने ज्या झालेल्या रकमा चलनाने भरणा केल्या आहेत मात्र पावती पुस्तक उपलब्ध नसल्याने जमा रकमेची खात्री करता आली नाही.

बुक क्र.	पावती क्र.	रक्कम
1124	112305	22
	112306	66
	112307	86
	112308	112
	एकूण	286/-

तरी लेखापरीक्षणास पावत्या उपलब्ध करुन योग्य रकमा स्विकारले बाबतचे लेखे परिक्षणास अवगत करावे.

परिच्छेद क्र.24.5:- संगणक पुरवठा नोंदीमधील अनियमितताबाबत...

मे. बी जे. ऑटोमेशन यास कडुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कोविड -19 कामी वैद्यकीय विभागासाठी दि.13/01/2021 रोजीचा कार्यादेश क्र. 327/20-21 नुसार संगणक पुरवठा करण्यात आला आहे (All in One Pc) सदरचे P.C खालील विभागांना पुरवठा करुन पोहोच म्हणून जंगम मालमत्ता नोंदवही मध्ये नोंद घेण्यात आली आहे.

1	डॉ. अनली पाटील	1
2	डॉ. रुची पटेल	3
3	इंदिरा गांधी हॉस्पीटल (सौ स्वाती आ. राणे)	1
4	वैद्यकीय आरोग्य विभाग (डॉ. प्रमोद पडवळ)	1
5	वैद्यकीय आरोग्य विभाग (सौ. योगिता शेळके)	1
6	वैद्यकीय आरोग्य विभाग श्री. विशाल वांद्रे व श्रीम. ललीता जोजारे	1

7	उपमहापौर दालनात (महेंद्र ज म्हात्रे)	1
	एकूण	9

याबाबत खालील आक्षेप आहेत

1. सदर खरेदी बाबतचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
2. याबाबतचा निविदा व निविदा मंजुर रकमेबाबत खात्री करता आली नाही.
3. संगणक Installation प्रमाणपत्र संबधिता कडुन प्राप्त झालेले नाहीत.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.24.6:- संगणक खरेदीबाबत...

कार्यादेश - जाक्र. मनपा/संगणक /292/2019-20 दि. 13/02/2020 अन्वये मे. बी. जे. ऑटोमेशन ऑफीस नं. 37 भुपनभवन दुसरा मजला, वजु कोटक मार्ग फोर्ट मुंबई - 400001 यांना Desk Computers (निविदामध्ये नमूद केलेल्या नुसार) 30 नग संगणक संच पुरवठा करणेकामी कार्यादेश दिलेले आहेत सदर संगणक प्रति नग रु. 49500/- (सर्व करासह) एकूण रक्कम रु. 1485000/- (सर्व करासह) मे. बी. जेण आटोमेशन यानी पुरवठा करण्याचा करार मा. आयुक्त सो. यांच्या दि. 03/02/2020 रोजीचा मंजुरी अन्वये दि. 03/02/2020 रोजी पुरवठा करण्यात आला आहे याबाबत खालील आक्षेप आहेत.

1. सदर संगणक खरेदीचे चलन लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे मागणी नुसार संगणक पुरवठा झाला असल्याची खात्री करता आली नाही.
2. सदर संगणकाची साठा रजिस्टरला नोंद घेण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे संगणक वितरणाची खात्री करता आली नाही.
3. सर्व करासह खरेदी प्रति नग रु. 49500/- असल्याने शासनाचा GST कर भरणा केल्या बाबतची खात्री करता आली नाही.
4. सदर संगणक विहित मुदतीत प्राप्त झाले बाबत डिलीव्हरी चलन उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही.
5. 30 संगणकांची वितरण यादी व त्याचा पोहोच लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध झालेली नाहीत.
6. वितरीत / वाटप करण्यात आलेल्या संगणकाचे Installation प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

वरील त्रुटीची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र.24.7:- घसारा आकारणी न केले बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाचे सन 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या संगणक लॅपटॉप इत्यादी मत्तावर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम 198 परिशिष्ट दोन मध्ये विहित केलेल्या दराने सरासरी घसारा पध्दतीनुसार 20% घसारा आकारणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही संगणक विभागाकडुन करण्यात आलेली नाही. संगणक लॅपटॉप इत्यादी वरती 20% घसारा आकारणी करुन अनुपालन लेखा परिक्षणास सादर करण्यात यावे.

आपत्ती व्यवस्थापन विभाग

परिच्छेद क्र. 25.1:- जडसंग्रह नोंदवहीत नोंदी नोंदविण्यात आलेल्या नसल्याबाबत ...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागाचे वित्त वर्ष 2020-2021 व 2021-22 हया कालावधीतील प्राप्त झालेले साहित्याचे तपशिल खालीलप्रमाणे

अ. कार्यादेश क्र. मनपा /आ. व्य /218/2021-22 दि. 28-09-2021

Invoice No .21-22/-oct.002 दि. 06-10-2021 Delivery Challan no. JL/009/ Date 01/10/2021

अ. क्र.	तपशिल	स्विकृत परिमाण
1.	चार्जेबल टॉर्च	30 नग
2.	चेन सॉ कटर	04 नग
3.	चेन सॉ कटर (विद्युत)	04 नग

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. सदरची नोंद / नमुना नं. 17 जगंम मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता सदरच्या नोंदी नमुना नं. 116 साठा नोंदवहीत घेण्यात आलेल्या आहेत
2. सदर जडसंग्रह वस्तू पुरवठा चलन लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत
3. घसारा नोंद नमूद करण्यात आलेल्या नाहीत.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.25.2:- मिरा भाईंदर महानगर पालिका पंडित भीमसेन जोशी रुग्णालयामध्ये कोविड - 19 वार्ड व ICU सेंटर मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे करारनामा मधील अनियमिता बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत आपत्ती व्यवस्थापन विभाग मार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका पंडित भिमसेन जोशी रुग्णालयामध्ये कोविड -19 वार्ड व ICU सेंटर मध्ये सी. सी. टी. व्ही यंत्रणा उभारणी करिता मं. मिरॅकापइले. सोल्यूशन इंडिया प्रा. लि. हयांची निविदा रक्कम रु. 1868672/- मंजूर करुन हया बाबतचा दि. 09/09/19 रोजी करारनामा केल्याचे कार्यादेशात नमूद केलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे नमूद मक्तेदांराना कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर कार्यादेशाचे आदेश क्र. मि.भा मनपा/आ.व्य.38/2020-21 दि. 17-07-2020 आहे.

हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपरिषदलेखासंहिता 2013 मधील नियम 134 तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 24/04/2015 मधील सुधारणा नुसार कार्यकंत्राट करारनामा करत असताना कार्यकंत्राट रक्कम रु. 10 लाखापर्यंत 500/- रु व त्या पुढिल प्राति लाखास अतिरिक्त 100/-रु. रकमेचे मुद्रांक जोडुन करारनामा करणे आवश्यक आहे. तथापि असा करारनामा करण्यात आलेला नाही.

2 मंजूर निविदा रक्कम रु. 1868672/- नुसार करारनामा 1400/- रुपये मुद्रांक जोडुन करारनामा करुन शासनाचे महसुली उत्पन्न वसुल करुन शासनाच्या महसुल खाती भरणा करुन लेखा परिक्षणास पूर्तता दर्शवावी.

3. सी. सी. टी. व्ही यंत्रणा मधील साहित्याची नोंदी नमूना नं. 17 जगंम मालमत्ता नोंदवहीत नोंदविलेले आवश्यक असताना अशा नोंदी नमुना नं. 17 मध्ये घेण्यात आलेल्या नाहीत तरी नमुना नं. 17 मध्ये नोंदी घेवून लेखा परीक्षणास अनुपालन पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र. 25.3:- वेदर स्टेशन खरेदी करुन कार्यान्वीत करणेकरिता केलेल्या करारनाम्यातील अनियमितता बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागाने मे. स्कायटेक एच.आर. सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्या समवेत वेदर स्टेशन खरेदी करुन कार्यान्वीत करणे बाबत दि. 13/07/2021 रोजी करारनामा मध्ये खालील प्रमाणे अनियमितता लेखापरीक्षणास निर्देशनास आलेल्या आहेत.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अधिनियम 73 प्रकरण 5 मधील नियम -2 प्रमाणे प्रत्येक संविदेवर स्थायी समितीचे कोणत्याही दोन सदस्यांचे अथवा नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या उपआयुक्त हयांच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी हयांच्या करारपत्रावर स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता करारनामा केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अधिनियम 74 (2) नुसार संविदा या अधिनियमाच्या तरतुदी व नियम यांस अनुसरुन केलेली नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

जनसंपर्क विभाग

परिच्छेद क्र.26.1 वस्तुसुची नोंदवहीतील नोंदीच्या अनुषंगाने आढळलेल्या त्रुटीबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2020-21 व 2021-22 च्या लेखा परिक्षणात जनसंपर्क विभागाकडील वस्तूसुची नोंदवही (साठा नोंदवही) ची डताळणी केली असता त्यातील आढळलेल्या त्रुटी प्रमाणे आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता सन 2013 च्या मधील नियम 62240 अनुसार ठेवण्यात आलेली नमूना 21 मधील वस्तुसुची नोंदवहीची पडताळणी केली असता विभागास प्राप्त झालेल्या सर्व वस्तुंची नोंद एकाच पृष्ठावर दर्शवली आहे. तथापि वस्तूसुची मध्ये प्रत्येक वस्तूसाठी स्वतंत्र पृष्ठ ठेऊन त्याचे मासिक व वार्षिक वापरलेले परीमाण तसेच त्यावर झालेला खर्च आणि राहीलेली शिल्लक यांचा आढावा घेणे आवश्यक असता अशी कार्यपध्दतीचा वापर केलेला नाही तरी या पुढिल कालवधी करिता लेखासंहिता नियमाप्रमाणे साठा नोंदवहीत नोंदी घेवून लेखापरिक्षणास पूर्तता दर्शवावी.

अतिक्रमण विभाग

परिच्छेद क्र. 27.1:- अतिक्रमण विभागातील अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत अतिक्रमण विभागाचे वित्त वर्ष 2020-21 ते 2021-22 हया कालावधीतील अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.01 दि.23/08/23 नुसार अवगत करण्यात आलेले होते.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिअयम 1949 चे कलम 105 (2) तसेच कलम 453 अनुसुची 5 प्रकरण 3 (2) मधील अ.क्र. 7 व 8 नुसार अभिलेख लेखापरीक्षणास करुन देणे आवश्यक आहे. तथापि असे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने त्या संबंधिचे लेखापरीक्षण करुन पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत लेखापरीक्षणास खालीलप्रमाणे पुर्तता दर्शवावी.

1) अनधिकृत बांधकाम शास्ती आकारुन वसुली तेरीजपत्रक प्रभाग 1 ते 6 वित्त वर्ष 2020-21 ते 2021-22 मधील एकुण प्रकरणे तपशिल
2) अतिक्रमण जप्ती व दंड वसुली प्रभाग 1 ते 6 एकुण जप्ती दंड रक्कम/ वसुली रक्कम/ थकबाकी व त्यातील मालमत्ता मिळकतीवर बोजा नोंदविल्याबाबतची माहिती
3) अतिक्रमण बांधकाम तोडुन साहित्य विक्री / लिलावापासुन प्राप्त झालेले उत्पन्न वित्त वर्ष 2020-21 ते 2021-22
4) अतिक्रमण बाबत व्याज प्रविष्ठ प्रकरणांची खालील नमुद विवरणपत्रात माहिती लेखापरीक्षणास अवगत करावी.

अतिक्रमण विभाग - प्रभाग 1 ते 6

विवरण पत्रक वर्ष 2020-21 (वर्ष निहाय)

अतिक्रमण न्याय प्रविष्ठ प्रकरण विवरणपत्रक

अ.क्र	मागील न्याय प्रविष्ठ प्रकरण	वित्त वर्ष 2020-21 2021-22 मधील न्याय प्रविष्ठ प्रकरण	एकुण न्याय प्रविष्ठ प्रकरण	निकाली निघालेले न्याय प्रविष्ठ प्रकरण	न्याय प्रविष्ठ प्रकरण निकालीपोटी झालेलई वसुली रक्कम	न्याय प्रकरणे थकीत प्रकरणे संख्या

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिवहन विभाग

परिच्छेद क्र. 28.1:- परिवहन विभागातील अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत परिवहन विभागाचे वित्त वर्ष 2020-21 ते 2021-22 ह्या कालावधीतील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.1 दि.23/08/2023 नुसार अवगत करण्यात आलेले होते.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 (2) तसेच कलम 453 अनुसुचि 'ड' प्रकरण 3(2) मधील अ.क्र. 7 व 8 नुसार अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे तथापि असे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने त्या संबंधिचे लेखापरीक्षण करुन पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत लेखापरीक्षणास खालीलप्रमाणे पुर्तता दर्शवावी.

i) कॅशबुक वित्त वर्ष 2020-21 / 2021-22
ii) बँक पासबुक
iii) दर्शनी मुल्य तिकिट साठा लेखा
iv) वैद्य भाडे शिवाय प्रवास दंड रक्कम वसुली
v) बँक ..... चार्जेस अनियमितताबाबत..
vi) वार्षिक अहवालानुसार जमा विवरण पत्रक
vii) प्रवासी कर रक्कम व बालपोषण अधिकार रक्कम शासन भरणा विवरणपत्रक
viii) परिवहन निधी स्थापन करणे
ix) ल मंजुर निविदा करारपत्रक व कार्यादेश

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

घनकचरा व्यवस्थापन (सार्व. आरोग्य विभाग)

परिच्छेद क्र.29.1:- सार्व. आरोग्य विभागातील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत….

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत घनकचरा विभागाचे वित्त वर्ष 2020-21 ते 2021-22 हया कालावधीतील अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.1 दि.23/08/2023 नुसार अवगत करण्यात आलेले होते.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 (2) तसेच कलम 453 अनुसुचित ड प्रकरण 3(2) मधील अ.क्र 7 व 8 नुसार अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि असे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने त्या संबंधिचे लेखापरीक्षण करुन पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत लेखापरीक्षणास खालीलप्रमाणे पुर्तता दर्शवावी.
   - i) घनकचरा व्यवस्थापन शासन अनुदान
   - ii) आरोग्य घनकचरा व्यवस्थापन शुल्क
   - iii) आरोग्य घनकचरा फी/ शुल्क/ दंड / इतर शुल्क जमा
   - iv) वित्त वर्ष 2020-21 व 2021-22 मधील घनकचरा ठेका करारपत्रक.
   - v) जमा केलेल्या अनामत रक्कम तपशिल
   - vi) न्याय प्रविष्ठ प्रकरण

   सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

पशुसंवर्धन विभाग

परिच्छेद क्र.30.1:- कोंडवाड्यात बंदिस्त केलेल्या जनावरांचा हजेरीपट न ठेवल्याबाबत….

पशुसंवर्धन विभागाच्या सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात कोंडवाड्यात बंदिस्त केलेल्या जनावरांचे हजेरीपट ठेवलेला नसल्याने त्यावर्षात सुरुवातीला किती जनावरे होती? नविन किती आली. दंडात्मक कार्यवाही करुन किती सोडली? व जीवदया मंडळाकडे किती बेवारस जनावरे वर्ग केली? याचा तपशिल उपलब्ध न झाल्याने पावतीने वसुल केलेला दंड रक्कम योग्य व अचुक असल्याची पडताळणी करता आलेली नाही.

परिच्छेद क्र.30.2 :- कोंडवाड्यात बंदिस्त केलेल्या जनावरांची व त्यांच्या मालकाची ओळख पटविण्यासाठी कार्यवाही न केल्याबाबत..

1) पशुसंवर्धन विभागाकडील सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात सामान्य पावत्यांवरुन पोटकिर्द व अनुषंगिक नोंदवहयांची पडताळणी केली असता कोंदवाड्यात बंदिस्त केलेल्या जनावरांची व ती जनावरे ज्या मालकांची आहेत याची खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच करारनाम्यातील अट क्र.23 व 26 नुसार जनावरे सोडविणा-याचे मुळ मालकाचे पॅन कार्ड, आधारकार्ड किंवा रेशन कार्ड घेणे आवश्यक असेल, बंधनकारक असेल तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.
2) सबंधित जनावर कोंडवाड्यात बंदिस्त करताना त्याला त्याच मालकाचे आहे हे ओळखण्यासाठी असणारी ओळख दर्शविणारा टॅग, रंग, शिंगे आदी तपशिल नोंद रजिस्टरमध्ये नोंद करुन ठेवणे आवश्यक असताना तशा नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत.
3) ती जनावरे सोडविण्यास आलेल्या इसमांकडुन जनावरे ताब्यात घेतल्याची पोच देखील घेण्यात आलेली नसल्याने काही कायदेशीर बाब उद्भवल्यास महानगरपालिकेस नाहक आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.30.3:- कोंडवाडा शुल्क आकारणी अनियमिततेबाबत…

पशुसंवर्धन विभागाकडील सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात सामान्य पावती पुस्तकावरुन पोटकिर्द, नोंदवहया इत्यादींची पडताळणी केली असता आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये नेमलेल्या कंत्राटदाराकडुन मोकाट व बेवारस जनावरांचा बंदोबस्त करताना घालुन दिलेल्या अटीशर्तीनुसार काम करणे आवश्यक आहे. तथापि याकामात खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येत आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय अभिप्राय आहेत.

1) मा.स्थायी समिती सभा दि.13/11/2003 चा ठराव 148 नुसार व करारनाम्यानुसार खालीलप्रमाणे प्रतिदीन / प्रति जनावर खावटी / खानावळ खर्चा वसुल करण्याचा आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र	जनावरांचे प्रकार	प्रतिदिन खानावळ खर्च
1	गाय / म्हैस	रु.50/-
2	गाय म्हैस यांचे वासरु	रु.25/-
3	घोडे / गाढव	रु.50/-
4	घोडे / गाढव यांचे पिल्ले	रु.25/-
5	डुकरे	रु.50/-
6	डुकरांची पिल्ले	रु.25/-
7	शेळ्या व मेंढ्या	रु.25/-
8	शेळ्या व मेंढ्या यांची पिल्ले	रु.15/-

वरीलप्रमाणे संबंधित कंत्राटदाराने खर्च आकारणी करुन वसुल करणे आवश्यक होते. तथापि सन 2019-20 मध्ये प्रतिदिन प्रतिजनावर खाणावळ खर्च वसुल केला नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सदर कोंडवाड्यात बंदिस्त असलेल्या जनावरांना त्या त्या बंदिस्त दिवसात पशुपोषण आहाराकरीता खानावळ खर्च व तत्सम आहार दिला किंवा कसे? तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा 1976 नुसार ह्याबाबत प्राणीमात्रा संघटनेमार्फत संबंधितावर गुन्हा दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच खावटी खर्च वसुल न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे?

सबब पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र.30.4:- मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याकरीता प्रजनन शस्त्रक्रीया योजनेतील अनियमितता...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत वर्ष 2020-21 व 2021-22 करीता ॲनिमल क्लेश प्रतिबंध कायदा 1960 व ॲनिमल उत्पत्ती प्रतिबंधक कायदा 2001 ह्या कायद्याचे पालन करुन महानगरपालिकेच्या प्रक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांवर प्रजनन शस्त्रक्रिया केलेली आहे. ह्याबाबत खालील अनियमितता आहेत.

1) प्रजनन शस्त्रक्रिया करुन ARV (ॲन्टी रेबीज वॅक्सीन) रेबीज प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक आहे व त्यानुसार ॲन्टी रेबीज लसीकरण करुन त्या कामांची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तरी याबाबत लेखापरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र.30.5:- कोंडवाडा पशुधन नोंदवही नमुना ठेवण्यात आलेला नसल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत पशुसंवर्धन विभागाकडील कोंडवाडा कार्यरत असुन त्या कोंडवाड्यात गुरे /डुकरे /शेळी/ मेंढी / गाढव / घोडा इ. प्राणी बंदिस्त ठेवण्यात येतात. सदर प्राण्यांची त्यांच्या मालकाकडुन कोंडवाडा शुल्क / दंड भरुन सुटका केली जाते. तथापि महाराष्ट्र नगरपरीषद लेखापरीक्षा संहिता नियम 62 मधील नमुना नं 34 मध्ये पशुसंवर्धन नोंदवही निहित केलेल्या नमुन्यात ठेवणे आवश्यक असताना अशी पशुधन नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे प्राण्यांचे वैयक्तिक वर्गीकरण नोंद बाह्यरुप लक्षणे (Phenotype character) इ. च्या नोंदी नसल्याने सदर जनावरे मुळ मालका एवजी इतर इसम ताब्यात घेवुन गेल्यास गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी नमुना नं-34 ठेवुन लेखपरीक्षणास अनुपालन पुर्तता दर्शवावी.

नगररचना विभाग

मोकळया जागेवरील मालमत्ता थकित मागणी रकमेची नोंद पुढिल आर्थिक वर्षाच्या मागणी नोंदवहीत समाविष्ठ न केल्याची अथवा थकित रकमेपेक्षा कमी थकित रक्कम नोंदवून घालेल्या आर्थिक नुकसानी बाबतचे विवरणपत्रक

सन 2016-2017 ते सन 2017–18 मोकळया जागेवरील करांची थकबाकी तफावत

अ.क.	मालमत्ता क्रमांक	अधिकार पत्र धारकाचे नांव	सन 2016-17 ची अखेरवी थकबाकी नोंद	सन 2017-18 ची सुरुवातीची थकबाकी	तफावत	शेरा
1	LUC 038	मेटो डेव्हलपर्स	8137705	0	8137705	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
2	LUC 079	नवरतन दमाणी	285220	178903	106317	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
3	LUC 083	श्री. गंगाधन दादु पाटील	305717	0	305717	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
4	LUC 093	मे आकृती ज	128494	0	128494	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
5	LUC 116	मे. बॉम्बे आकीटेक्चर	199073	0	199073	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
6	LUC 151	श्रीम. फिलोमिना जेरोन रॉड्रीक्स	648140	171791	476349	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
7	LUC 158	श्री. विशाल डी शाह	28575	0	28575	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
8	LUC 163	मंगेश अे. पाटील, वंदना मंगेश पाटील	2236077	538835	1697242	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
9	LUC 167	यमुना बाई धर्माजी पाटील	1143633	389621	754012	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
10	LUC 174	श्री. सुनिल सक्तेरिया	609074	259496	349578	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
11	LUC 177	श्री. ऐवान जसीम ब्राटो इतर इ.	436956	0	436956	थकबाकी कमी दर्शविलेली आहे.
